QR कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २२२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि.३ आक्टोंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## मी आभार मानतो, त्यांनी माझे १००० रुपये वाचवले...!

### मुख्यमंत्री फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंची उडवली खिल्ली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३मुंबई**

मुंबईतील शिवाजी पार्क मैदानावर गुरुवारी शिवसेना ठाकरे गटाचा दसरा मेळावा पार पडला. या मेळाव्यातील उद्धव ठाकरे यांच्या भाषणावर प्रतिक्रिया देत, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरेंची खिल्ली उडवली आहे. मी जे बोललो, ते त्यांनी (उद्धव ठाकरे) सत्य करून दाखवलं आणि माझे हजार रुपये वाचवले. याबद्दल मी त्यांचे आभार मानतो, अशा शब्दांत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे



यांना टोला लगावला आहे ते मुंबईत पत्रकारांसोबत बोलत होते.

मुख्यमंत्री, फडणवीस म्हणाले, मी उद्धव ठाकरे यांचे आभार मानेन की उद्धव ठाकरे यांनी माझे १००० रुपये वाचवले. कारण मी आव्हान केले होते की, उद्धव ठाकरे यांच्या भाषणात विकासासंदर्भात एक तरी मुद्दा दाखवा आणि एक हजार रुपये मिळवा. काल, मी तर काही त्यांचं भाषण ऐकलं, पण मी त्यांचं भाषण संपल्या बरोबर, जे भाषण ऐकणारे आहेत त्यांना आणि काही पत्रकारांना विचराले की, बाबामला आता हजार रुपायंचा फटका आहे का? उद्धव ठाकरे काही तरी विकासावर बोलले का? अख्या भाषणात ते विकासासंदर्भात एक मुद्दाही बोलले नाहीत. बोलूच शकत नाहीत.

ते (उद्धव ठाकरे) केवळ अद्वा-तद्वा बोलतात. खरं म्हणजे, त्यांचं बोलणं हे स्वगत असतं. कारण पुढे माणसंही नव्हते. यावेळेस तर अशी परिस्थिती होती की, पुढे माणसंही नव्हती. त्यामुळे त्यांचं स्वगत होतं. पण तरीही त्यांचे आभार मानतो की, त्यांनी नेहमीच्या पद्धतीने लोकांच्या संदर्भात, विकासाच्या संदर्भात, लोककल्याण कसं करणार? राज्याला पुढे कसं नेणार? बीएमसीला पुढे कसं नेणार? यासंदर्भात अवाक्षरही न काढता, मी जे बोललो ते सत्य करून दाखवलं आणि माझे हजार रुपये वाचवले. त्याबद्दल आभार, असा चिमटाही फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांना लगावला.

## ‘नादी लागाल तर तुझ्यासह दादांच्या राजकारणाचा देव्हारा करीन’ ; जरांगेंचा धनंजय मुंडेंना थेट इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ छत्रपती संभाजीनगर**

माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी गुरुवारी झालेल्या दसरा मेळाव्यात मराठा आरक्षणावर बोलत त्यांना ओबीसीमधून नव्हे तर वेगळे आरक्षण द्या अशी मागणी केली होती. यामुळे मराठा आरक्षण लढ्याचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी मुंडे यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे. माजी मंत्री धनंजय मुंडे यांचा एकेरी उल्लेख करीत ते म्हणाले, तुला क्लिअर सांगतो. शहाणपणा करू नको, मी दादा (अजित पवार) मोजत नसतो. माझ्या नादी लागला तर तुझ्यासह अजित पवार यांचाही राजकीय करिअरचा देव्हारा करीन, असा थेट इशाराच जरांगे पाटील यांनी शुक्रवारी सकाळी येथे दिला.




प्रकृती खालावल्यामुळे शहरातील खाजगी रुग्णालयात दाखल असलेल्या जरांगे पाटील यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले की, अतिवृष्टीमुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या हाता-तोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पाठिशी सरकारने उभे राहणं गरजेचे आहे. मात्र केवळ हेक्टरी ५० हजार रुपये मदत देऊन काय होणार आहे, त्यांची जनावरे मेली, त्यांच्या जमिनी खरवडून निघाली आणि घरादारात पाणी शिरल्याने सर्वस्व गेले आहे. अशा परिस्थितीत त्यांना पुन्हा उभं राहता येईल अशी मदत दिवाळीपूर्वी द्यावी अशी आमची मागणी आहे. अन्यथा शेती विचारवंताशी बोलून शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर मोठं राज्यव्यापी आंदोलन उभारण्याचा इशारा त्यांनी दिला. एकाही मंत्र्याला राज्यात फिरता येणार नाही, असे त्यांनी सांगितले.

**तीन समाजाचे स्वार्थी नेते मराठाद्वेषी**

माळी, धनगर व वंजारी समाजाचे नेते स्वार्थी राजकारणापोटी मराठा आरक्षणाला विरोध करीत आहेत. मात्र हे नेते म्हणजे त्यांचा संपूर्ण समाज होत नाही. परिमाणी आज गावांत मराठा आणि ओबीसी समाजात कोणतेही वाद नसल्याचे जरांगे यांनी सांगितले.

## सुरक्षित डिजिटल जगासाठी एकत्र उभं राहण्याचा संकल्प करु; राणी मुखर्जीचा निर्धार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३मुंबई**

सुरक्षित डिजिटल जगासाठी एकत्र उभं राहण्याचा संकल्प करण्याचा निर्धार अभिनेत्री राणी मुखर्जीने सायबर जनजागृती कार्यक्रमात केलायं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अभिनेता अक्षय कुमार, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्या उपस्थितीत सायबर जनजागृती २०२५ चे उद्घाटन पार पडलं. यावेळी राणी मुखर्जीने संबोधित केलं.

पुढे बोलताना राणी मुखर्जी म्हणाली, सायबर अवेअरनेस मंथच्या उद्घाटनाचा भाग होणे माझ्यासाठी अत्यंत सन्मानाची आणि अभिमानाची गोष्ट आहे. वर्षानुवर्षे, माझ्या चित्रपटांमधून मला अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या आणि दुर्बलांचे रक्षण करणाऱ्या स्त्रिया साकारण्याचे भाग्य लाभले आहे. खरं तर, आज मी थेट मर्दानी ३ च्या शूटिंगवरून येथे आले आहे, त्यामुळे हा क्षण अतिशय विलक्षण वाटतो. महाराष्ट्र पोलिसांनी घेतलेली ही पुढाकार प्रशंसनीय असल्याचं मुखर्जी म्हणालीयं.




तसेच आज सायबर गुन्हे विशेषत: महिलांवर आणि मुलांवर होणारे शांतपणे आपल्या घराघरात शिरत आहेत. एक स्त्री आणि आई म्हणून मला ठाऊक आहे की जागरूकता किती महत्त्वाची आहे. जेव्हा कुटुंबांना कसे सुरक्षित राहायचे आणि मदत कुठे मिळेल हे माहित असते, तेव्हाच खरी सुरक्षा सुरू होते. या महत्त्वाच्या मोहिमेला प्राधान्य दिल्याबद्दल मी माननीय मुख्यमंत्री, माननीय -उड साहेब आणि आदरणीय ऊग्रझ मॅडम यांचे आभार मानत असल्याचं त्या म्हणाल्या आहेत.राणी मुखर्जी यांनी महिलांवर आणि मुलांवर वाढणाऱ्या सायबर गुन्ह्याविषयी जागरूकता वाढवली आणि महाराष्ट्र पोलिसांच्या सायबर सेलचे कौतुक केले. हे ते अनोळखी नायक आहेत जे रात्रंदिवस एक सुरक्षित डिजिटल जग निर्माण करण्यासाठी काम करत असतात.दरम्यान, डायल १९३० आणि डायल १९४५ या हेल्पलाइन सर्व नागरिकांसाठी वरदान आहेत. एक कलाकार म्हणून मी पडद्यावर कथा जिवंत करते, पण एक स्त्री, एक आई आणि एक नागरिक म्हणून मला वाटते की हे आपले सामूहिक कर्तव्य आहे की कोणतेही मूल शांतपणे रडू नये, कोणतीही स्त्री असुरक्षित वाटू नये आणि कोणतेही कुटुंब सायबर गुन्ह्यामुळे आपली शांतता गमावू नये, असंही त्या म्हणाल्या आहेत.आपल्या भाषणाचा समारोप करताना त्या म्हणाल्या चला आज आपण सगळे मिळून सतर्क राहण्याचा, आवाज उठवण्याचा आणि सुरक्षित डिजिटल जगासाठी एकत्र उभे राहण्याचा संकल्प करूया. राणी मुखर्जी यांचा पुढील चित्रपट मर्दानी ३ २७ फेब्रुवारी २०२६ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. हा चित्रपट यश राज फिल्म्सच्या बॅनरखाली तयार होत आहे आणि दिग्दर्शन अभिराज मिनावाला यांनी केले आहे.

## पंकजा मुंडेंनी दिलेला त्रास मला रडत सांगायचा

### आज आधार वाटतो का? करुणा शर्मांचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३बीड**

पंकजा मुंडे यांनी दिलेला त्रास मला रात्री दोन-दोन वाजेपर्यंत मांडीवर रडून सांगत होता, आज तिचा आधार वाटतो का? असा थेट सवाल धनंजय मुंडे यांच्या पत्नी करुणा शर्मा यांनी केला आहे. दरम्यान, दसरा मेळाव्यानिमित्त आमदार धनंजय मुंडे यांनी भाऊ बहिणीच्या संबंधावर भाष्य केलं. त्यावरुन शर्मा यांनी प्रतिक्रिया दिलीयं.




२५० दिवस माझी खूप वाईट मानसिकता होती. माझी बहिण माझ्या जवळ येऊन तासन् तास बसत होती. मीडिया ट्रायल सुरु होतं, तेव्हा बहिणीने मला आधार दिला, पक्षाच्या महायुतीच्या नेत्यांनी आधार दिला असल्याचं विधान धनंजय मुंडे यांनी केलं होतं.या मुद्द्यावर पुढे बोलताना करुणा शर्मा म्हणाल्या, २००९ पासून ते २०२२ पर्यंत हे भाऊ-बहिण एकमेकांसाठी कट कारस्थान रचत होते. आज ज्या बहिणीला आधार मानतात ती किती त्रास देत होती. तुम्ही माझ्या मांडीवर रात्री दोन वाजेपर्यंत रडत होता. आज तिचाच आधार वाटतो का? पंकजा मुंडे शेतकऱ्यांना कसा न्याय देतील? असा सवालही करुणा शर्मा यांनी केलायं.

तसेच कारखान बंद केला, गोरगरीब लोकांचे पैसे ने देता दोन्ही कारखाने बंद केले आहेत. आज ऊसतोड कामगारांचे पैसे ३०-३०, ४०-४० कोटी दोन्ही कारखान्यांमध्ये अडकलेले आहेत, पण तुम्ही देत नसल्याचा आरोप करुणा शर्मा यांनी केलायं.दरम्यान, काल झालेल्या दसरा मेळाव्यात वाल्मिक कराडचे पोस्टर झळकवण्यात आले. हे संकेत आहे की काय पण असू द्या, आमच्या पोटाचं पाणी वाल्मिक कराडशिवाय हालत नाही, ना हलणार, त्यासाठी परळीत त्यांना कोणी नवीन व्यक्ती नकोयं, जे गुंडाराज संपवतील. जरी माझ्यासारखा कोणी नवीन आला तर तो गुंडाराज संपवेल, राजकारण संपवेल, यासाठी दोघे बहिणभाऊ एकत्र आले असल्याचं करुणा यांनी म्हटलंय.

## जुन्या एसटीला एचएसआरपी नंबरप्लेट; एक कोटींचा खर्च

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३मुंबई**

एसटी महामंडळाच्या ताफ्यात असलेल्या जुन्या बसला एचएसआरपी म्हणजेच हाय सिक्युरिटी रेजिस्ट्रेशन प्लेट बसवण्याची तयारी केली आहे. आत्तापर्यंत महामंडळाने १२ हजार ३४१ नंबरप्लेटची ऑर्डर दिली असून, त्यापैकी ११ हजार २६८ प्लेट मिळाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.



राज्यात एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सुमारे २ कोटी वाहनांवर एचएसआरपी म्हणजेच उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसवण्यास सुरुवात झाली आहे. यामध्ये लाखो शासकीय वाहनांचादेखील समावेश आहे. एसटीच्या ताफ्यात २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सुमारे १४ हजारपेक्षा जास्त बस आहेत. एका एचएसआरपी प्लेटसाठी ८७९ रुपयांचा खर्च आहे. त्यानुसार महामंडळाला ताफ्यात असलेल्या जुन्या बससाठी अंदाजे १ कोटी ८ लाख ४७ हजार रुपयांचा खर्च येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

नव्याने दाखल झालेल्या अनेक बसलाच एचएसआरपी नसल्याचे ‘लोकमत’ने मार्च महिन्यात निदर्शनास आणले होते. त्यामुळे एकीकडे राज्यातील सामान्य वाहनधारकांना एचएसआरपीची सक्ती करताना सार्वजनिक वाहतूक उपक्रमातील एसटी महामंडळाला हा नियम लागू होत नाही का? असा प्रश्न आता उपस्थित करण्यात आला होता. दरम्यान, त्यानंतर कंपनीला तत्काळ या नंबरप्लेटचा पुरवठा करण्यास सांगितल्याचे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. एचएसआरपीशिवाय वाहन रस्त्यावर चालविणे नियमबाह्य असल्याने कंपनीने पुरवठा करताना चूक केल्याबद्दल त्यांना काही दंड केला की नाही, याबाबत मात्र माहिती दिलेली नाही.

## परतवाड्यातील संशयितांच्या चौकशीसाठी अकोला-मुंबई पोलिस परतवाड्यात तळ ठोकून


### अमरावती ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद ही ‘ऑन द स्पॉट’

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३परतवाडा**

हरियाणा राज्यातील आंतरराष्ट्रीय कुख्यात गँगचे सक्रिय सदस्य असलेल्या ११ जणांना अमरावती ग्रामीण पोलीस व नागपूर गुन्हे शाखेच्या संयुक्त पथकाने परतवाडा येथून ताब्यात घेतले. २ ऑक्टोबर रोजी रात्री १० ते ११ च्या सुमारास ती चकमक उडाली. यात ग्रामीण गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षकांकडून हवेत एक राउंड फायर देखील करण्यात आला.

दरम्यान, ताब्यात घेतलेल्या ११ पैकी सात जणांची परतवाडा पोलीस स्टेशनमध्ये कसून चौकशी केली जात आहे. तर उर्वरित चौघांना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहात चौकशीसाठी नेण्यात आले आहे. कॅनडामध्ये बसून भारतात गुन्हेगारी कारवाया करणाऱ्या एका कुख्यात गँगशी ते संबंधित असल्याचे समोर आले आहे. अमरावती ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद व स्थानिक गुन्हे शाखा प्रमुख किरण वानखडे हे २ ऑक्टोबर रोजी दुपारी दीडच्या सुमारास परतवाडा येथे पोहोचले.

हरियाणा येथील ते टोळीचे सदस्य परतवाडा येथील ब्राह्मण सभा भागातील एका घरात दडले असल्याची माहिती अमरावती ग्रामीण पोलिसांना मुंबई गुन्हे शाखेने दिली होती. सोबतच हरियाणा पोलिसांच्या माहितीनुसार नागपूरचे गुन्हे शाखेचे पथक देखील अमरावती ग्रामीण पोलिसांना येऊन मिळाले. माहितीनुसार एसपी विशाल आनंद व एलसीबी प्रमुख किरण वानखडे हे दुपारी दीड वाजता पासूनच परतवाडा येथील एका



घराजवळ थांबले होते. दसऱ्याची गडबड कमी झाल्यानंतर गुरुवारी रात्री दहाच्या सुमारास स्थानिक गुन्हे शाखेने आरोपींना पकडण्यासाठी आघाडी घेतली. त्यात अमरावती ग्रामीण पोलिसांकडून हवेत एक फायर देखील करण्यात आला.

कारवाईदरम्यान दोन ठिकाणाहून एकूण ११ जणांना ताब्यात घेण्यात आले. दरम्यान शुक्रवारी सकाळी मुंबई सह अकोला येथील एटीएसचे पोलीस पथक देखील परतवाड्यात पोहोचले आहे. अमरावती ग्रामीण पोलीस व नागपूर गुन्हे शाखेचे पथक मुंबई व अकोला येथील पोलीस पथकाला सहकार्य करत असून दुपारी बारा वाजेपर्यंत या प्रकरणातील संपूर्ण तथ्य उघड होईल, असे पोलिसांकडून सांगण्यात आले.

११ जणांपैकी एक जण हरियाणा व कॅनडा इथून चालविल्या जाणाऱ्या त्या आंतरराष्ट्रीय टोळीचा सक्रिय सदस्य असल्याचे देखील समोर आले आहे. मात्र ती १० ११ जणांची टोळी नेमकी परतवाडा येथे येऊन नेमकी कुठल्या गुन्हेगारी कारवाई करणार होती ते स्पष्ट होऊ शकलेले नाही. ब्राह्मण सभा भागातील ज्या घरातून या ११ संशयतांना ताब्यात घेण्यात आले, त्या घरात गेल्या पाच ते सहा वर्षांपासून सहा महिन्यात दहा ते बारा लोक येऊन आयुर्वेदिक औषधी वा अन्य तत्सम वस्तू विकण्याचा व्यवसाय करीत असतात. तरी यातील मुख्य सूत्रधार हा गुरुवारीच परतवाड्यात दाखल झाला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. अनुसार हरियाणा पोलिसांनी नागपूर क्राईम ब्रँचला तर मुंबई क्राईम ब्रँचनी अमरावती ग्रामीण पोलिसांना त्यांना ताब्यात घेण्याची सूचना दिली होती. त्या ११ संश्वेतांकडून अग्नि शस्त्र व अन्य शस्त्रास्त्रे जप्त केल्याची माहिती हाती आली आहे.

## संपादकीय ......

# भाजपच्या हाताबाहेर जाणारी सांस्कृतिक शिस्त!

जतचे भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यातून विस्तव जात नाही. नुकत्याच झालेल्या दसरा मेळाव्यात पडळकरांनी पुन्हा एकदा जयंत पाटलांविरोधात असंसदीय भाषेचा वापर केला. पडळकरांनी जयंत पाटील यांचा फक्त एकेरी भाषेतच उल्लेख केला नाही तर जयंत्या म्हणत त्यांच्यावर टीका केली. प्रत्येक सभेत जयंत पाटील यांच्यावर वैयक्तिक टीका केली जात आहे. पडळकरांचा जयंत पाटील यांच्या राजकारणाला असलेला विरोध समजू शकतो. तो त्यांनी करावा, तसा त्यांना अधिकार आहे. मात्र एका ज्येष्ठ राजकारण्याचा, नेत्याचा एकेरी उल्लेख, त्यांच्या वडिलांचे नाव घेऊन त्यांच्यावर केली जाणारी टीका, या सगळ्यामुळे महाराष्ट्राची राजकीय संस्कृती प्रदूषित होत आहे, याचा विचार भाजपच्या नेतृत्त्वानेही करण्याची गरज आहे. फक्त पडळकरच नाहीत, आणखी काही आमदार आणि मंत्रीही अशा वक्तव्यांमुळे वातावरण बिघडवत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे वारंवार सांगत असतात की, पडळकरांच्या बोलण्याचा तसा अर्थ नाही. त्यांच्या मनात तसे काही नाही. मात्र धनुष्यातून निघालेला बाण आणि मुखातून निघालेले शब्द हे मागे फिरत नाहीत, त्यांनी केलेला घाव मनात खोलवर झालेला आसतो. या जखमा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि बावनकुंळेंच्या शाब्दिक फुंकरणे बर्या होणार्या नसतात.

जयंतराव पाटील ही राजाराम बापूंची औलाद वाटत नाही, हे पडळकरांचे एका भाषणातील शब्द आहेत. दसरा मेळाव्याच्या भाषणात त्यांनी जयंतराव, तुझ्या कितव्या बायकोचं मंगळसूत्र मी चोरलं? असा सवाल केला. त्यानंतर जयंत्या म्हणत हल्ला चढवला. ही भाषा महाराष्ट्राच्या राजकारणाला नक्कीच शोभणारी नाही. पडळकर ज्या पक्षाचे सध्या प्रतिनिधीत्व करतात तो पक्ष कधीकाळी 'पार्टी विथ डिफरन्स' म्हणून ओळखला जात होता. मात्र भारतीय जनता पक्षानेही आता सर्व साधनसुशिता सोडलेली आहे. वाजपेयी, अडवाणी, जेटली, सुषमा स्वराज यांचा भाजप आणि २०१४ नंतरचा भाजप यात ३६० कोनात फरक पडलेला आहे, हेही मान्यच. आज भाजपचे नेतृत्त्व नरेंद्र मोदी आणि अमित शहांकडे आहे. या नेत्यांची विरोधकांबद्दलची भाषा देखील संसदेच्या कोणत्याही आचारसंहितेत बसणारी नसते. हा भाषेचा घसरता स्तर आहे की, नेत्यांच्या वैचारिकतेचा, हा आता संशोधनाचा विषय झाला आहे.

राष्ट्रीय स्वंयसेवक संघाला २७ सप्टेंबर २०२५ रोजी शंभर वर्षे पूर्ण झाली आहेत. संघाचा शताब्दी सोहळा नागपूरपासून देशभरात साजरा होत आहे. भारतीय जनता पक्षाची ही मातृसंस्था. संघाने १९२५ मध्ये लावलेल्या रोपट्याला आज ९०, ९५, १०० वर्षांनंतर फळे आली आहेत. शिक्षण, संधी, सत्ता, संपत्तीपासून दूर राहिलेल्या वंचित, शोषित, आदिवासी, बहुजन समाजापर्यंत पोहोचून त्यातून नेतृत्त्व उभं करायचे काम संघाने गेल्या काही दशकांमध्ये सचोटीने केले. यासाठी संघाच्या अनेक पिढ्यांनी काम केले. त्यांची नावेही आज अनेकांना माहीत नसतील. महाराष्ट्रात भाजपला फक्त हिंदुत्वाच्या मुद्यावर सत्तेवर येता येणार नाही, हे लक्षात आल्यानंतर ८०च्या दशकात वसंतराव भागवतांनी 'माधव' फॉर्म्यूला महाराष्ट्राच्या राजकारणात आणला. मराठा समाज प्रभावशाली असलेल्या महाराष्ट्रात बहुसंख्येने असलेला माळी, धनगर, वंजारी समाजाला एकत्र करुन त्यांना भाजपसोबत जोडण्याचे काम भागवतांनी केले. त्यांच्या माधव फॉर्म्युल्याचे पहिले फलित राहिले गोपीनाथ मुंडे. प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे, पांडुरंग फुंडकर, एकनाथ खडसे आणि महादेव शिवणकर या सारखे नेते त्याकाळात निर्माण झाले. गोपीनाथ मुंडे राज्याच्या उपमुख्यमंत्री पदापर्यंत पोहोचले. ओबीसी समाजाला संघ-भाजपासोबत जोडण्याची ही रणनीती किती यशस्वी ठरली हे गेल्या दीड, दोन दशकात महाराष्ट्रासोबतच देशाने पाहिले आहे. गोपीनाथ मुंडे यांचा पहिला हल्ला हा शरद पवारांवरच असायचा. प्रस्थापित नेतृत्त्वावर हल्ला करुनच ओबीसींचे नेतृत्त्व उभे राहू शकते. ओबीसी, वंचित, आदिवासींना सोबत घेऊन संपूर्ण सत्ता मिळवता येऊ शकते, हे भाजपने ओळखले. त्यातून आता पडळकरांसारखे नेते पुढे आणले जात आहेत.

गोपीनाथ मुंडेंनी शरद पवारांवर सातत्याने हल्ले चढवले असले तरी वैयक्तिक पातळीवर जाऊन, त्यांच्या कुटुंबापर्यंत जाऊन कधीही टीका केली नाही. भाषेची, सभ्यतेची, सुसंस्कृतपणाची सीमारेषा या नेत्यांनी ओलांडली नाही. राजकीय पातळीवर एकमेकांवर गाडीभर आरोप करणारे हे नेते वैयक्तिक आयुष्यात मात्र माणुसकी जपत होते. मुंडेंना सहकारी साखर कारखाना उभा करायचा तेव्हा विलासराव देशमुखांनी मदत केली होती. देशमुख आणि मुंडे हे एकमेकांचे विरोधी नेते एकाच मंचावर आल्यानंतर त्यांच्या भाषणातील जुगलबंदी पाहणे पर्वणी ठरायचे. बाळासाहेब ठाकरे आणि शरद पवार यांच्यातील राजकीय विरोध टोकाचा, मात्र वैयक्तिक आयुष्यापर्यंत त्यांनी तो कधी येऊ दिला नाही. पडळकरांचे राजकारणच पवार कुटुंबावरील टीकेपासून सुरू होते. शरद पवारांवर त्यांच्या शारीरिक व्यंगावर अतिशय खालच्या पातळीवर टीका करणे. सुप्रिया सुळे, त्यांचे पती आणि राजकारणाशी संबंध नसलेल्या त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींवर केलेले आरोप कोणालाही पटणारे नाहीत. अजित पवार आता महायुतीचा भाग आहेत म्हणून त्यांच्यावरील हल्लाबोल थांबला आहे. अन्यथा पडळकरांच्या रडारवर बारामतीचे सगळेच पवार कायम असतात. या टोकाच्या पवार विरोधातूनच त्यांनी बारामतीमधून निवडणूकही लढवली होती. पण त्यांना राजकीय यश मिळाले ते भाजपच्या तिकिटावर जत विधानसभेतून.

विधान भवनात आमदार गोपीचंद पडळकर आणि शरद पवारांचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या कार्यकर्त्यांमध्ये झालेली फ्री स्टाईल अवघ्या महाराष्ट्राने पाहिली.

# अमरावती महापालिकेत महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती-** गुरुवार दि. २ ऑक्टोबर २०२५ रोजी अमरावती महानगरपालिकेत राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त हारर्पण कार्यक्रम संपन्न झाला. महानगरपालिका कॉन्फरन्स हॉल येथे गांधीजी व शास्त्रीजी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर जयस्तंभ चौकातील महात्मा गांधींच्या पुतळ्याला महानगरपालिका आयुक्त सौ. सौम्या शर्मा चांडक यांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त योगेश पिठे, सहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर, उद्यान अधीक्षक अजय विंचुरकर, कार्यालय अधीक्षक गुलशन मिरानी, नगरसचिव संदीप वडुरकर, निवडणूक अधिकारी अक्षय निलंगे, उद्यान निरीक्षक श्रीकांत गिरी, प्रमोद मोहोड, भूषण खडेकार यांसह महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी महात्मा गांधींच्या वेशभूषेत कलाकार सर्जेराव गलपट यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाला विशेष आकर्षण प्राप्त करून दिल

# जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त श्री गाडगे महाराज वृद्धाश्रमात कार्यक्रम



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती-**

जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त दिनांक १ ऑक्टोबर २०२५ रोजी श्री गाडगे महाराज वृद्धाश्रम, वलगांव (जि. अमरावती) येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या प्रसंगी ज्येष्ठ नागरिकांना शारीरिक व मानसिक आरोग्य कसे जपावे याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या विविध कायद्यांची माहिती देऊन त्यांच्या हक्कांविषयी जागरूकता निर्माण करण्यात आली. कार्यक्रमादरम्यान ज्येष्ठ नागरिकांचा सन्मानपूर्वक सत्कारही करण्यात आला.कार्यक्रमाला समाज कल्याण प्रादेशिक कार्यालयाचे वित्त व लेखा विभागाचे सहाय्यक संचालक डॉ. दिनेश मेटकर, तसेच समाज कल्याण निरीक्षक श्री. पवन साबळे, लघु लेखक श्री. किशोर कदम, कनिष्ठ लिपीक श्री ऋषिकेश तायडे, संगणक ऑपरेटर श्री धिरज कुयरे उपस्थित होते.वृद्धाश्रमाचे संचालक डॉ. कैलास बोरसे यांनी मान्यवरांचे स्वागत करून कार्यक्रमाचे आयोजन यशस्वी केले.हा उपक्रम ज्येष्ठ नागरिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करताना त्यांच्या आरोग्य व अधिकारांविषयी समाजात सकारात्मक संदेश देणारा ठरला.




# चष्म्याचा नंबर सारखा वाढतो? ४ व्यायाम करा, मुलांनाही करायला लावा- नजर होईल तेज..

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक २**

दृष्टी चांगली होण्यासाठी डोळ्यांचे कोणते व्यायाम करावे?



दृष्टी चांगली राहण्यासाठी कोणते व्यायाम केले पाहिजेत, याविषयीची माहिती सांगणारा व्हिडिओ डॉक्टरांनी या इंस्टाग्राम पेजवर शेअर केली आहे.

१. यामध्ये सांगितलेला पहिला व्यायाम म्हणजे नाकाने दिर्घ श्वास घ्या आणि तो जलद गतीने नाकानेच बाहेर सोडा. असं साधारण २० वेळा करावे.

२. यानंतरचा दुसरा व्यायाम म्हणजे नाकाने दिर्घ श्वास घ्या आणि तो तोंडावाटे सोडा. ही क्रियादेखील २० वेळा करावी.

३. यानंतर दिर्घ श्वास घ्या आणि तुम्हाला शक्य होईल तेवढा वेळ तसेच राहा. त्यानंतर हळूहळू श्वास सोडा. असं साधारण ५ ते १० वेळा करा.

४. नजर चांगली होण्यासाठी नियमितपणे भ्रामरी प्राणायाम करणेही खूप फायदेशीर ठरते. यासाठी दोन्ही हातांचे अंगठे कानावर ठेवून कान बंद करा. यानंतर करंगळी, अनामिका आणि मधले बोट डोळ्यांवर ठेवून डोळे बंद करा. दोन्ही हातांच्या तर्जनी कपाळावर ठेवून डोळे बंद करा.

दिर्घ श्वास घ्या. डोळे बंद करा आणि हम्म्म असा आवाज काढत हळूवारपणे श्वास सोडा. अशा पद्धतीने सकाळी १० वेळा आणि संध्याकाळी १० वेळा प्राणायाम करावे. वरील सगळे व्यायाम नियमितपणे केल्यास काही दिवसांतच दृष्टी चांगली झाल्यासारखे जाणवेल.

# जाणून घ्या करडई पिकाचे आधुनिक रब्बी लागवड तंत्र आणि अधिक उत्पादनाचे उपाय

**दि.३ विदर्भ प्रजासत्ताक**

रब्बी पिकाची निवड करताना कमी पाण्यात, कमी खर्चात जास्त उत्पादन देणारे आणि अवर्षणाचा ताण सहन करणारे पीक विचारात घेतल्यास करडईसारखे फायदेशीर दुसरे पीक नाही. करडई हे रब्बी हंगामातील एक महत्त्वाचे तेलबिया पीक आहे. भारतातील एकूण करडई क्षेत्रापैकी ७० टक्के क्षेत्र महाराष्ट्रात आहे.

अलीकडे करडई लागवडीचे क्षेत्र खूप कमी झाले आहे. या पिकाचे क्षेत्र घटण्याची काही प्रमुख कारणे म्हणजे मोठ्या प्रमाणात हंगामातील पावसात बदल, रोगांचा प्रादुर्भाव, तसेच इतर स्पर्धात्मक पिके उदा. ज्वारी, सूर्यफूल, हरभरा. करडईचे बाजारभाव इतर पिकांच्या मानाने कमी असल्यामुळे शेतकरी अधिक फायदा देणाऱ्या पिकांकडे वळले.

जागतिक व्यापार खुला झाल्यामुळे स्वस्तात पामतेल आयात करण्याचा पर्याय निवडल्यामुळे करडई तेलाच्या किमती कमी राहिल्या; त्यामुळे हे पीक परवडेनासे झाले. वास्तविक पाहता करडई तेल आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. करडईच्या तेलात असंपृक्त आम्लाचे प्रमाण जास्त असल्यामुळे हृदयरोग असणाऱ्यांसाठी करडई तेल उत्तम आहे.

**सुधारित लागवड तंत्रज्ञान**

जमीन - करडईच्या पिकासाठी मध्यम ते भारी खोल जमीन निवडावी. ६० ते ९० सें.मी. पेक्षा जास्त खोल जमिनीत करडईचे पीक चांगले येते. त्याचप्रमाणे जमीन पाण्याचा निचरा होणारी आणि ओलावा टिकवून ठेवणारी असावी. पाणी साचून राहिल्यास करडईच्या पिकाचे उत्पन्न घटते. थोड्याफार चोपण जमिनीतही हे पीक येऊ शकते.

पूर्वमशागत - करडई पिकाची मुळे खोल जात असल्यामुळे खोल नांगरट करावी. त्यानंतर कुळवाच्या ३ ते ४ पाळ्या द्याव्यात.

**पेरणीचा कालावधी** - करडईची पेरणी योग्यवेळी करणे फार महत्त्वाचे आहे. लवकर पेरणी (सप्टेंबरचा पहिला पंधरवडा) केल्यास पानावरील ठिपके या बुरशीजन्य रोगामुळे पिकाचे फार नुकसान होते आणि पर्यायाने उत्पादनात घट येते. याउलट उशिरा पेरणी केल्यास (ऑक्टोबरचा दुसरा पंधरवडा) पीक थंडीच्या काळात आल्यामुळे माव्याचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होतो आणि उत्पादनात घट येते.

**बियाणे व बीजप्रक्रिया** - पेरणीसाठी करडईचे १० किलो बी प्रती हेक्टरी वापरावे. करडईवरील मर रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी थायरम, कॅप्टन किंवा कार्बेन्डाझिम २ ते ३ ग्रॅम प्रतिकिलो बियाण्यास किंवा ट्रायकोडर्मा व्हिरीडी या जैविक बुरशीनाशकाची प्रतिकिलो बियाण्यास ४ ते ५ ग्रॅम प्रमाणे बीजप्रक्रिया करावी.

**पेरणीचे अंतर** - करडई पिकाच्या दोन ओळीमधील अंतर ४५ सें.मी. आणि दोन रोपांमधील अंतर २० सें.मी. ठेवावे.

**खतांचे व्यवस्थापन** - करडई हे पीक सेंद्रिय व रासायनिक खतास उत्तम प्रतिसाद देणारे आहे. प्रति हेक्टरी १० गाड्या चांगले कुजलेले शेणखत जमीन तयार करतांना टाकून त्यावर शेवटची वखराची पाळी घालावी.रासायनिक खतांचा वापर करावयाचा झाल्यास कोरडवाहू करडईसाठी प्रति हेक्टरी ५० किलो नत्र व ३५ किलो स्फुरद पेरणीच्या वेळी, तर बागायती पिकासाठी ७५ किलो नत्र व ५० किलो स्फुरद दोन चाड्याच्या तिफणीच्या साहाय्याने बियाण्याच्या खाली पडेल अशा पद्धतीने द्यावे.

**विरळणी व आंतरमशागत** - करडई पीक जमिनीतील ओलाव्यावर वाढत असल्यामुळे, पेरणीनंतर १० ते १२ दिवसांनी दोन जोमदार रोपांमधील अंतर २० सें.मी. ठेवून विरळणी करणे अत्यंत गरजेचे आहे. प्रति हेक्टरी झाडांची संख्या १,११,१११ एवढी राखावी.

गरजेनुसार खुरपणी व कोळपणी करून शेत स्वच्छ ठेवावे. तसेच जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी पेरणीपासून तिसऱ्या आठवड्यात फटीच्या कोळप्याने, दातेरी सायकल कोळप्याने कोळपणी करावी.

**विशेष गुणधर्म**

फुले करडई (एस.एस.एफ - ७३३) १२० ते १२५ १३ ते १६ अधिक उत्पादनासाठी, पांढऱ्या फुलांचा काटेरी वाण. माव्यास मध्यम प्रतिकारक. तेलाचे प्रमाण २९%.

५ फुले चंद्रभागा (एस.एस.एफ.७४८) १३० ते १४० जिरायती १३ ते १५, बागायती २० ते २५ कोरडवाहू आणि बागायतीसाठी उत्तम. काटेरी वाण. माव्यास मध्यम प्रतिकारक. अखिल भारतीय स्तरावर लागवडीसाठी शिफारस.




६ परभणी कुसुम (पी.बी.एन.एस.१२) १३५ ते १३७ १२ ते १५ (कोरडवाहू) कोरडवाहू आणि बागायतीसाठी योग्य वाण. मर व पानावरील ठिपके रोगास प्रतिकारक. मावा किडीस सहनशील. दाणे टपोरे. तेलाचे प्रमाण २९%.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

७ परभणी ४० (बिन) (पी.बी.एन.एस.४०) ११८ ते १२८ १५ ते १६ (कोरडवाहू), २० ते २२ (बागायती) बिनकाटेरी वाण. ८ नारी - ६ १३० ते १३५ १० ते १२ बिगरकाटेरी. पाकळ्यासाठी योग्य. पानावरील ठिपक्यांच्या रोगास प्रतिकारक्षम. तेलाचे प्रमाण ३०%. संरक्षित पाण्याखालील लागवडीस योग्य.

**संकरीत वाण**

नारी.एन.एच.- ११३० ते १३५ २० ते २३ संकरित बिगरकाटेरी वाण, पाकळ्यासाठी, संरक्षित माव्यास सहनशील, बागायतीसाठी, अखिल भारतीयस्तरावर लागवडीसाठी शिफारस.

**पाणी व्यवस्थापन**

एक पाणी : पेरणीनंतर ५० ते ५५ दिवसांनी.

दोन पाणी : पेरणीपूर्वी जमीन ओलावणीसाठी पहिले पाणी आणि दुसरे पेरणीनंतर ३५ ते ४० दिवसांनी.

पहिले पाणी पेरणीपूर्वी जमीन ओलावणीसाठी, दुसरे पाणी पेरणीनंतर ३५ ते ४० दिवसांनी व तिसरे पाणी पेरणीनंतर ६५ ते ७० दिवसांनी द्यावे.

करडईची फुले उमलण्यास सुरुवात होताच 'सायकॉसिल' या वाढ प्रतिरोधकाच्या १००० पीपीएम तीव्रतेच्या (१००० मि.ली. प्रति ५०० लीटर पाणी) द्रावणाची प्रति हेक्टरी फवारणी केल्यास उत्पादनात वाढ होते.

पीक संरक्षण

करडई पिकाचे माव्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. मावा किडीच्या नियंत्रणासाठी ३०% डायमिथोएट (१५ मि.ली. प्रति १० लिटर पाणी) या कीटकनाशकाची फवारणी करावी किंवा थायोमेथॉक्सॅम/ॲसिटामिप्रिड ३ ते ४ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी, किंवा ॲसिफेट १६ ग्रॅम/१० लिटर पाणी, किंवा क्लोथायनिडीन १ ग्रॅम/१० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

**डॉ. गणेश कपूरचंद बहुरे**
प्राचार्य, कृषि महाविद्यालय, खंडाळा ता. वैजापुर जि. छ. संभाजीनगर.

# दिल्लीसह अनेक ठिकाणी दसऱ्याला पावसाचा धुमाकूळ, रावण जळण्याऐवजी भिजला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३नवी दिल्ली**

गेल्या काही दिवसांपासून देशभरात कोसळत असलेल्या मुसळधार पावसाने आज दुसऱ्यादिवशी उत्तर भारतातील अनेक भागात जोरदार हजेरी लावली. मुसळधार पावसामुळे दिल्ली, नोएडा, पाटणा, जौनपूर या शहरांसह इतर ठिकाणी रामलीला मैदानांवर आयोजित रावण दहनाच्या कार्यक्रमांना मोठा फटका बसला.नोएडा येथील रामलीला मैदानावर मुसळधार पावसामुळे रावण, मेघनाद, कुंभकर्ण यांचे पुतळे भिजले. तर रावण दहनाचा कार्यक्रम पाहण्यासाठी आलेले लोकही पावसापासून बचावासाठी इकडेतिकडे पळताना दिसत होते.

तर दिल्लीतील इंद्रप्रस्थ येथील रामलीला मैदानात आयोजित रावण दहनाच्या कार्यक्रमातही पावसामुळे व्यत्यय आला. येथे पंतप्रधान नरेंद्र मोदींचं आगमन होण्यापूर्वी पाऊस सुरू झाला. त्यामुळे रावणासह दहशतवादाचे प्रतीक म्हणून तयार करण्यात आलेले




पुतळे भिजले. लाल किल्ला परिसरात आयोजित रावण दहनाच्या कार्यक्रमावरही पावसाने पाणी फिरवले. त्यानंतर आयोजकांनी रावणाचे पुतळे झाकून ठेवण्याची व्यवस्था केली. उत्तर प्रदेशमधील जौनपूर जिल्ह्यातील शाहजंग येथील रामलीला मैदानात मुसळधार पावसामध्येच रावण दहन करण्यात आले. पावसामुळे रावणाचा पुतळा कोसळला. मात्र आयोजकांनी रावणाच्या पुतळ्याचं तिथेच दहन केलं. यादरम्यान, उपस्थितांनी छत्र्यांमधून रावण दहन पाहिलं.बिहारमधील पाटणा येथील गांधी मैदान येथेही रावण दहनाची तयारी सुरू असताना पाऊस पडायला सुरुवात झाली. त्यामुळे रावण, कुंभकर्ण आणि मेघनाथाचे पुतळे भिजून गेले. तसेच पावसामुळे रावणाचं डोकं तुटून खाली कोसळलं. विजयादशमीच्या मुहुर्तावर रावण दहनासाठी लोकांनी खूप गर्दी केली होती. मात्र त्यांच्या उत्साहावर पावसामुळे विरजण पडलं.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

शुक्रवार दि. ३ ऑक्टोंबर २०२५

शहर/ग्रामिण

# परतवाडा येथे चकमक : हरियाणाची कुख्यात ११ जणांची टोळी पोलिसांच्या ताब्यात




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३परतवाडा –** परतवाडा शहरात २ ऑक्टोबर रोजी रात्री सुमारे १०:३० वाजता पोलिस आणि हरियाणामधील कुख्यात चोरट्यांच्या टोळीमध्ये झालेल्या चकमकीने शहरात एकच खळबळ उडवून दिली. मिळालेल्या माहितीनुसार, टोळीतील दोन सदस्यांनी पोलिसांवर हवेत गोळीबार केला. सुदैवाने या गोळीबारात कोणताही पोलीस कर्मचारी जखमी झाला नाही.

घटनेनंतर बस स्थानक परिसरातील संपूर्ण भाग पोलिस छावणीत बदलण्यात आला आहे. पोलिसांचा मोठा फौजफाटा या ठिकाणी तैनात करण्यात आला असून, संपूर्ण भागात कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, नागपूर क्राईम ब्रांचची टीम अमरावती ग्रामीण पोलिसांच्या डउइ (लोकल क्राईम ब्रँच) पथकासोबत मिळून एका विशेष माहितीच्या आधारे परतवाड्यात दाखल झाली होती. पोलिसांनी सुरुवातीला ब्राह्मण सभा परिसरातून तीन अत्यंत धोकादायक गुन्हेगारांना अटक करण्यात यश मिळवले. या तिघांची चौकशी केल्यानंतर उर्वरित पाच आरोपींच्या शोधासाठी पथके रवाना करण्यात आली.



**बस स्थानकाजवळ गोळीबार–** दरम्यान, रात्री सुमारे १० ते १०:१५ च्या दरम्यान बस स्थानक परिसरात पोलिस आणि टोळीतील सदस्यांमध्ये चकमक झाली. टोळीने पोलिसांवर हवेत गोळीबार केला,

मात्र प्रत्यक्ष कोणालाही गोळी लागलेली नाही. काही वेळ चाललेल्या या खटाटोपानंतर पोलिसांनी सर्व आरोपींना ताब्यात घेतले.

### दसऱ्याच्या रात्री उडाली खळबळ

दशऱ्याच्या रात्री घडलेल्या या घटनेमुळे संपूर्ण परतवाडा शहरात खळबळ माजली आहे. स्थानिकांमध्ये कुजबुज सुरू असून अटक झालेली टोळी एका राजकीय व्यक्तीच्या संपर्कात होती, अशी माहिती स्थानिक पातळीवर चर्चेत आहे. पोलिसांकडून याबाबत तपास सुरू आहे.या प्रकरणात पोलिसांनी एकूण ११ आरोपींना शस्त्रांसह अटक करण्यात आली असून या प्रकरणाचा तपास अँटी टेररिस्ट स्क्वॉड (–ढड) व जिल्हा ग्रामीण गुन्हे शाखा करत आहेत.या घटनांमुळे परतवाडा परिसरात मोठी खळबळ उडाली असून राजकीय कार्यकर्त्याच्या घराचा यात संबंध असल्याने चर्चांना उधाण आले आहे.

**अधिकृत माहिती अद्याप बाकी–** सध्या पोलिसांकडून या कारवाईबाबत अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. अटक केलेल्या आरोपींना सुरुवातीला परतवाडा किंवा अचलपूर पोलीस ठाण्यात नेण्यात येणार असून त्यानंतर त्यांना अमरावती किंवा नागपूर पोलिसांच्या ताब्यात दिले जाण्याची शक्यता आहे.या संपूर्ण कारवाईचे नेतृत्व अमरावती डउइ चे अधिकारी वानखेडे यांनी केले. संबंधित स्थानिक पोलीस ठाण्याला केवळ कारवाईची प्राथमिक माहिती देण्यात आली होती.

# नव्या मूल्यमापन निकषांमुळे शाळांची स्वायत्तता धोक्यात ?

## शिक्षक, मुख्याध्यापकांचे मत; विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी निर्णय : शिक्षण आयुक्त

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.३अमरावती**

राज्यातील इयत्ता पहिली ते बारावी शाळांसाठी सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन पद्धतीत नवीन बदल करण्यासाठी शिक्षण विभागाने २५ सप्टेंबर रोजी सर्व शाळांसाठी सूचना जारी केल्या. या बदलांमुळे शाळांची स्वायत्तता मर्यादित होऊ शकते, असे मत शिक्षक संघटनांनी व्यक्त केले आहे

शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी सांगितले की, शिक्षकांना नवीन मूल्यमापन धोरण अवलंबण्यात प्रारंभिक काळात अवधी लागू शकतो, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अपेक्षित प्रगतीसाठी हे निकष बदलले जात आहेत. जिल्हा निहाय तज्ज्ञ शिक्षक गट सहामाही आणि घटक चाचण्यांसाठी प्रश्नपत्रिका तयार करतील. शाळांनी स्वत:चे प्रश्नपत्रिक वापरायचे असल्यास एक महिना आधी मान्यता घेणे आवश्यक आहे. राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषदेकडून शिक्षकांसाठी प्रश्नपत्रिका तयार करण्याचे प्रशिक्षण ही दिले जाणार आहे.

> अनुदानित शाळांच्या शिक्षकांवर याचा परिणाम होणार आहे. सेल फायनान्स इंग्रजी माध्यमाच्या व इतर बोर्डाच्या शाळांत अंमलबजावणी होत नाही.
>
> **सुभाष मोरे,** कार्याध्यक्ष, शिक्षक भारती.

### शिक्षकांमध्ये संभ्रम

अकरावीचे वर्ग सप्टेंबरमध्ये सुरू झालेले आहेत. बारावीचे अर्धे शैक्षणिक वर्ष सरलेले आहे. यावर्षी नववीची पॅट परीक्षा बंद केली. मागील वर्षी इयत्ता पाचवी, आठवीसाठी भाषा, गणित, इंग्रजी तृतीय भाषा या विषयांच्या परीक्षा दोनवेळा घेतल्या. त्यामुळे नवीन निकष ऑगस्ट २०१० च्या निर्णयाशी विसंगत असल्याचे विद्याभूषण हायस्कूलचे मुख्याध्यापक संजय पाटील यांनी सांगितले. तर निकष बदल हे प्राथमिक शाळांसाठी नाही, असे प्राथमिक शिक्षक समितीचे कार्याध्यक्ष विजय कोंबे यांनी सांगितले.



## शुभ मुहूर्तावर बंपर खरेदी

# जीएसटी कपातीमुळे दसऱ्याच्या मुहूर्तावर टीव्ही, एसी, फ्रिजला पसंती

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती–** साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या दसऱ्याच्या मुहूर्तावर गुरुवारी अमरावतीतील ग्राहकांनी इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंची जोरदार खरेदी केल्याचे पाहायला मिळाले. यंदा केंद्र सरकारने इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंवरील वस्तू आणि सेवा करामध्ये (जीएसटी) २८ वरून १८ टक्क्यांपर्यंत कपात केली आहे. त्यामुळे दर कमी झाल्याने ग्राहकांनी टेलिव्हिजन (टीव्ही), एअर कंडीशनर (एसी), ओव्हन, फ्रिज, वॉशिंग मशीन आदींची मोठ्या प्रमाणावर खरेदी केली.



परिणामी बाजारात चैतन्याचे वातावरण आहे.जीएसटीच्या कपातीमुळे सर्व वस्तूंचे सुधारित दर नवरात्रोत्सवाच्या पहिल्या दिवसापासून लागू झाले. त्यामुळे यंदा नवरात्र–दसऱ्याच्या मुहूर्तावर बाजारपेठांमध्ये कपडे, दागदागिने, सजावटीच्या वस्तूंसोबतच ईलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या खरेदीकडे ग्राहकांचा अधिकशहरातील प्रमुख मॉल्स, ईलेक्ट्रॉनिक शोरूम्स, तसेच ई–कॉमर्स कंपन्यांनी आणलेल्या आकर्षक ऑफर्स, सवलतींचाही लाभ घेत ग्राहकांनी यंदा मोठ्या प्रमाणावर खरेदी केली. अनेक ग्राहकांनी नवरात्रोत्सवात वस्तूंचे बुकिंग करून दसऱ्याच्या मुहूर्तावर वस्तूंची डिलिव्हरी घेतली. एका खरेदीदाराने सांगितले की, सणासुदीला घरात नवी वस्तू आणणे शुभ मानले जाते. जीएसटी कपातीमुळे आम्ही यंदा मोठा स्मार्ट टीव्ही घेण्याचा निर्णय घेतला.

### ५ ते २५ हजार रुपयांपर्यंत कॅशबॅक, बाय बँक

दुसरीकडे विक्रेत्यांनी ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंवर ५ ते २५ हजारांपर्यंतची कॅशबॅक, बाय बँक, सवलती, बँक ऑफर, अतिरिक्त वॉरंटी, सुलभ ईएमआय आदी योजना आणल्या होत्या.मध्यमवर्गीय ग्राहक मोठ्या प्रमाणावर स्मार्ट टीव्ही आणि डबल–डोअर फ्रिज घेण्यासाठी पुढे आल्याचे दुकानदारांनी सांगितले.

### यंदा दिवाळीतही तेजी ?

सणासुदीला बाजारपेठेत नेहमीच उत्साह असतो, मात्र यंदा जीएसटी कपात, आकर्षक ऑफर्सची सुवर्णसंधी साधत दुसऱ्याच्या शुभमुहूर्तावर ग्राहकांनी खरेदी करून आपला आनंद द्विगुणित केल्याचे विक्रेत्यांचे म्हणणे आहे. दिवाळीतही अशीच तेजी पाहायला मिळेल, असा अंदाज त्यांनी वर्तवला.

# अमरावतीत दुर्गा माता महादौड उत्साहात आणि शौर्याच्या भगव्या जल्लोषात पार



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती–** अमरावतीत दसऱ्याच्या पर्वावर श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीने आयोजित दुर्गा माता महादौड उत्साह, भक्ती आणि शौर्याच्या वातावरणात संपन्न झाली. ही महादौड केवळ शारीरिक नव्हे, तर धर्म, देशभक्ती आणि मातृशक्तीचा जागर करणारी होती.

शहरातील स्वागत नवदुर्गा मंडळापासून सुरुवात झालेल्या या दौडीस भगव्या पताकांनी, घोषणांनी आणि पारंपरिक वेशभूषेत सहभागी हजारो धारकाऱ्यांनी रंगत आणली. यामध्ये महिलांचा शस्त्रप्रदर्शन पथक, शिवाजी महाराज व जिजाऊ यांची झांकी आणि लहान मुलांचा सहभाग विशेष आकर्षण ठरले.

या वेळी ध्वजवाहक म्हणून शुभम कामनापूरे यांना सन्मान मिळाला.

राजापेठ येथे खासदार डॉ. अनिल बोंडे व अरुण पडोळे यांनी ध्वजवाहकत्व स्वीकारले. कोल्हापूरहून आणलेल्या पवित्र भंडाऱ्याची उधळण झाली. २००० ते २५०० धारकाऱ्यांनी तिन्ही रांगेत शिस्तबद्ध धाव घेतली.

महिलांनी केलेल्या शस्त्रप्रदर्शनाने उपस्थितांची मने जिंकली, तर नागरिकांनी फुलांची उधळण करून स्वागत केले. महादौडीतून धर्म–संस्कृती रक्षण, मातृशक्तीचा गौरव आणि एकात्मतेचा संदेश दिला गेला.ही महादौड अमरावतीच्या इतिहासातील एक संस्मरणीय पर्व बनली आहे.

# घरफोडीचे दोन गुन्हे उघडकीस; चार आरोपी ताब्यात, मुद्देमाल जप्त

## गुन्हे शाखा अमरावतीची मोठी कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती**

अमरावती शहरातील गाडगेनगर पोलीस ठाणे हद्दीत घरफोडीचे दोन गुन्हे उघडकीस आले असून, गुन्हे शाखा अमरावतीने चार आरोपींना ताब्यात घेतले आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

दि. २९ सप्टेंबर २०२५ रोजी संगरम विनायकराव वानखडे यांच्या घरात चोरी झाल्याची तक्रार गाडगेनगर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. तपासादरम्यान गुप्त माहितीच्या आधारे आरोपी इसरार खान (वय ३१) आणि सैयद तनवीर (वय २१), दोघेही राहणार रहमत नगर, यांना अटक करण्यात आली. त्यांनी दोन घरफोड्यांची कबुली दिली असून, एकूण १,२६,००० किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तसेच गाडगेनगर पोलीस ठाण्यात दाखल अन्य गुन्ह्यातील फरार आरोपी भारत उर्फ मक्की घूगे (वय २८) व अभिषेक जाधव (वय २४) यांनाही ताब्यात घेण्यात आले आहे.ही



कामगिरी मा. पोलीस आयुक्त अरविंद वावरे, उपायुक्त रमेश धुमाळ, सहाय्यक आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पो.नि. संदीप चव्हाण, सपोनि अमोल कडू, महेश इंगोले, मनिष वाकोडे व त्यांच्या पथकाने केली

# वसतिगृहातील ‘निर्वाह भत्ता’ वाढला, खर्चाचे नो टेन्शन



**विदर्भ प्रजासत्ताकदि.३अमरावती**

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागांतर्गत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण व उच्च शिक्षण घेता यावे, यासाठी शासकीय वसतिगृहे योजना राबविण्यात येत आहे. त्यात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याचा निर्वाह भत्ता व मुलींना प्रसाधनासाठी मिळणाऱ्या भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.शासकीय वसतीगृहात विद्यार्थ्यांची निवास व्यवस्था, नाष्टा, जेवण, दैनंदिन खर्चासाठी निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य, गणवेश,वैद्यकीय साहित्य, रेनकोट, तर कला शाखेतील विद्यार्थ्यांसाठी चित्रकला, शैक्षणिक सहल, करमणूक व्यवस्थेसाठी भत्ता, क्रीडा वस्तू खरेदीसाठी रक्कम आदी सुविधा देण्यात येतात.–

# जिल्ह्यात साथीच्या आजारात मलेरियाचाच धोका

## अधिकआरोग्य विभाग म्हणते काळजी घेणे गरजेचे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती** २१जिल्ह्यात सध्या व्हायरल फिव्हरने कहर केला असून, घरोघरी रुग्ण दिसत आहेत. अशातच डासजन्य आजार त्यात भर घालत आहेत. हेच कारण आहे की, जिल्हावासी बदलते वातावरण व डास अशा चक्रव्यूहात अडकले असून, आजारांना बळी पडत आहेत. जिल्ह्यात डासांपासून मलेरियाचाच धोका जास्त दिसून येत आहे. कारण, या वर्षातील आकडेवारी बघितली असता डेंग्यू व चिकुनगुनियापेक्षा मलेरियाचेच रुग्ण जास्त दिसून येत आहेत. आतापर्यंत १०० च्या वर अधिक रुग्णांची नोंद घेण्यात आली आहे.



पावसाळा म्हटला, म्हणजे आजारांचाच काळ असतो. त्यानुसार, जिल्ह्यात सध्या व्हायरल फिव्हरने नाकीनऊ आणले आहे. घराघरांत तापाचे रुग्ण निघत असतानाच डासांनीही मलेरियाचा प्रसार सुरू केला आहे. जिल्ह्याला डासांचे ग्रहण असून, त्यांचा नायनाट करणेही शक्य नाही अशी स्थिती आहे. ही बाब शहरापुरतीच मर्यादित नसून अवघ्या जिल्ह्यालाच डासांनी ग्रासून सोडले आहे. डासांपासून मलेरिया व डेंग्यूचा धोका जास्त आहे. मात्र, जिल्ह्यात डेंग्यूपेक्षा मलेरियाचा जास्त धोका दिसून येत आहे. या वर्षातील आकडेवारी बघितली असता जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यापर्यंत मलेरियाच्या १०० हुन अधिक रुग्णांची नोंद घेण्यात आली आहे. तर, डेंग्यू रुग्णांची त्यापेक्षा कितीतरी कमी आहे. विशेष म्हणजे, दरवर्षी मलेरिया रुग्णांचीच संख्या जास्त असल्याचे हमखास दिसून येते. यामुळेच जिल्ह्यात मलेरियाचाच धोका जास्त आहे.

# श्री शिवाजी शिक्षण संस्थेने जोपासली परंपरा

# वैचारिक सोन्याची लूट, सोने समर्पण कार्यक्रम



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती–** शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी सुरू केलेल्या सोने समर्पण कार्यक्रमाची परंपरा कायम ठेवत यावर्षी देखील श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने वैचारिक मंथन घडवून मोठ्या उत्साहात प्रथा जोपासण्यात आली. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने दसरा निमित्त सोने समर्पण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख तर प्रमुख अतिथी म्हणून खासदार बळवंत वानखडे, आमदार संजय खोडके,आमदार सुलभाताई खोडके यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाला श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या कार्यकारिणीचे उपाध्यक्ष ड.गजाननराव पुंडकर, ड.भैय्यासाहेब पाटील पुसदेकर, केशवराव मेतकर, कोषाध्यक्ष दिलीप बाबू इंगोले, सदस्य हेमंत काळमेघ, प्राचार्य केशवराव गावंडे , सुरेशराव खोटरे, प्रा.सुभाषराव बनसोड, सचिव डॉ.वि.गो ठाकरे, स्वीकृत सदस्य प्राचार्य डॉ. अंबादास कुलट, प्राचार्य अमोल महल्ले, नरेश पाटील, प्राचार्य पी .व्ही वायाळ यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. सर्वप्रथम सर्व मान्यवरांनी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या पुतळ्याला सोने समर्पण करून पुष्पांजली अर्पण केली. त्यानंतर महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांना जयंतीनिमित्त अभिवादन केले. श्री शिवाजी शिक्षण संस्थेने भाऊसाहेबांनी सुरू केलेली परंपरा जोपासत दरवर्षीच दसरा सणाच्या दिवशी सोने समर्पण कार्यक्रम आयोजित करून परंपरा व प्रथा कायम ठेवली आहे. श्री.शिवाजी शिक्षण संस्था नेहमीच उत्तम कार्य करत असून संस्थेचा आणखीनही भरभराट होत राहील अशा भावना मान्यवरांनी व्यक्त केल्या. व उपस्थितांना दसऱ्यानिमित्त शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला उपस्थित सर्वांनीच एकमेकांना आपट्याची पाने देत दसरा निमित्त शुभेच्छा दिल्या. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून शिव परिवारातील नागरिकांचे आभार मानत शुभेच्छा स्वीकारल्या. कार्यक्रमाचे संचालन संस्थेचे सचिव डॉ.वि.गो ठाकरे यांनी केले. यावेळी शिव परिवारातील आजीवन सभासद,प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संकटात जो घरी बसतो तो कसला आला शिवसैनिक?

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची उद्धव ठाकरेंवर टीका




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३मुंबई –** कपड्याची इस्त्री सांभाळणारा, व्हॅनिटी व्हॅन घेऊन दौरा करणारा, वर्क फार्म होम, फेसबुक लाइव्ह करणारा हा एकनाथ शिंदे नाही, आपत्तीत घरात बसणारा बाळासाहेबांचा शिवसैनिक असूच शकत नाही. यांचे दौरे म्हणजे 'खुद को चाहिए काजू बदाम, पानी में उतरे तो सर्दी जुकाम'. कुठेही गेले की माझे हात रिकामे आहेत म्हणतात, जेव्हा होते तेव्हा दिले नाही, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्या पूरग्रस्त दौऱ्यांवर जोरदार टीका केली.

शिंदेसेनेचा दसरा मेळावा गुरुवारी गोरेगाव येथे झाला. त्यावेळी ते बोलत होते. शिंदेसेनेने पूरग्रस्तांना दिलेल्या मदतीच्या पाकिटांवर फोटो लावल्याबद्दल केलेल्या टीकेचा समाचार घेताना ते म्हणाले, यांना फोटो दिसतात, पण २६ प्रकारच्या जीवनावश्यक वस्तू आम्ही दिल्या, तुम्ही एक बिस्कीटचा पुडा तरी घेऊन गेलात का? पक्षाचा प्रमुख पक्षातील कार्यकर्ते संपवण्यासाठी कधी कारस्थान करतो का? याला संपव,त्याला संपव, हे पक्षप्रमुख नाहीत, हे कारस्थान करणारे कटप्रमुख आहेत. म्हणून त्यांची ही परिस्थिती झाली.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री दिवाळीपूर्वी मदत देण्याचा शेतकऱ्यांना दिला शब्द बळीराजाचे दुःख मोठे आहे. मी बांधावर जाऊन त्यांचे दुःख पाहिले. जिथे संकट तिथे हा एकनाथ शिंदे धावून गेल्याशिवाय राहणार नाही. माझी लाडक्या शेतकऱ्यांना विनंती आहे तुम्ही धीर सोडू नका, तुमचे भाऊ इकडे आहेत. दिवाळीपूर्वी मदत देऊ अशा शब्दांत त्यांनी बळीराजाला आश्वस्त केले. मराठवाडा विदर्भात शेतकऱ्यांच्या मुला-मुलींची लग्न ठरली असतील, त्याची सर्व जबाबदारी शिंदेसेना घेईल. २०२६ हे वर्ष बाळासाहेबांचे जन्मशताब्दी वर्ष असून ते जोरदार साजरे केले जाईल, असे शिंदे यांनी जाहीर केले.

> **शंभर वर्षे झालेल्या संघावर टीका करणारे कसले हिंदुत्ववादी?**
>
> राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला १०० वर्ष झाली, त्यांनी समर्पित भावनेने देशाची सेवा केली, पण संघावर टीका करणारे कसले हिंदुत्ववादी? असा सवाल शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना केला.

# संघ मेहनतीला लागलेले भाजप हे विषारी फळच!

## उद्धव ठाकरे यांचा दसरा मेळाव्यात घणाघात



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३मुंबई–** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मेहनतीला आलेले विषारी फळ म्हणजे भाजप, अशी घणाघाती टीका उद्धवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिवाजी पार्कवर पक्षाच्या दसरा मेळाव्यात गुरुवारी केली. मुस्लिम महिलांकडून राखी बांधून घेण्याची तर कधी 'बटेंगे तो कटेंगे' म्हणण्याची पंतप्रधान मोदी यांची आणि भाजपची भूमिका सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांना मान्य आहे का, असा सवालही त्यांनी केला.

**....तर राज्यभर आंदोलन करणार –** शेतकऱ्यांच्या घरादाराचा चिखल झाला आहे. देवेंद्र फडणवीस हे आमचे राज्य होते तेव्हा म्हणत होते, 'ओला दुष्काळ जाहीर करा.' आता म्हणतात, 'अशी संज्ञाच नाही.' तुमची संज्ञा खड्ड्यात घाला, पण जनतेला मदत करा. सगळे निकष बाजूला ठेवा, हेक्टरी ५० हजार मदत करा. कर्जमुक्ती करा. अन्यथा राज्यभरात आम्ही रस्त्यावर उतरून आंदोलन करू. बिहारमध्ये निवडणूक आहे म्हणून तिथे महिलांना १०-१० हजार रुपये दिले, महाराष्ट्रासाठी पैसा का नाही, असा सवाल ठाकरे यांनी पंतप्रधान मोदींना केला.

**राजसोबतच राहण्याची ग्वाही–** तुम्ही आणि राज ठाकरे एकत्र येणार का? अशी विचारणा सभेतील गर्दीतून झाली. त्यावर उद्धव म्हणाले, मी आणि राज एकत्र आलोय ते एकत्र राहण्यासाठीच. मातृभाषेचा घात होत असेल तिथे मराठी माणसात फूट पडू देणार नाही. हिंदीला विरोध नाही; पण सक्ती करायची नाही. मुंबईला व्यापाऱ्यांच्या खिशात टाकू देणार नाही.

> भरपावसात झालेल्या या सभेत उद्धव यांनी पाऊस अंगावर घेतच भाषण दिले. त्यांनी भाजपला सुनावले की, आमच्या हिंदुत्वावर शंका घेऊ नका. भाजप म्हणजे अमिबा आहे. ध्येय ना धोरण असा हा पक्ष मन मानेल तसा पसरत चालला आहे. कमळाबाईने स्वत:ची कमळे फुलवली; पण जनतेच्या आयुष्याचा चिखल झाला आहे, अशी टीकाही त्यांनी केली. भाजप आता हिंदू-मुस्लीम करत आहे, परंतु सरसंघचालक मोहन भागवत हे मशिदी, मदरशात जातात, मुस्लिमांचा धार्मिक नेता त्यांना राष्ट्रपिता म्हणतो. भागवतांनी अशाप्रकारे हिंदुत्व सोडले, असे म्हणण्याची हिंमत भाजपमध्ये नाही.
>
> **उद्धव ठाकरे, पक्षप्रमुख उद्धवसेना**

# दिवाळीपूर्वी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा होणार : अजित पवार



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३ठाणे–** पावसामुळे पिकांचे नुकसान झालेल्या राज्यातील शेतकऱ्यांच्या बँक खात्यात दिवाळीच्या आत पैसे जमा करू, असे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी गुरुवारी ठाण्यात पत्रकारांशी बोलताना दिले. तर, गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेला मुरबाड माळशेज रेल्वेमार्ग मार्गी लावण्यासाठी पक्षाचे उपाध्यक्ष प्रमोद हिंदूराव यांना दिल्लीला सोबत नेऊन रेल्वेमंत्र्यांकडे पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही पवार यांनी मुरबाड येथील एका कार्यक्रमात दिली. पक्षाचे मुख्य प्रवक्ते आनंद परांजपे आणि नजीब मुल्ला हे ठाण्यात उपस्थित होते.

चार वर्षे निवडणुका न झाल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेत प्रतिनिधित्व करणाऱ्या कार्यकर्त्यांची संधी हुकली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्याप्रमाणे ३१ जानेवारी २०२६च्या आत जिल्हा पंचायत, नगरपालिका, महानगरपालिका या निवडणुका घ्याव्या लागणार आहेत. ५ ऑक्टोबरला देशाचे गृहमंत्री अमित शहा राज्यात येत आहेत. तेव्हा मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री त्यांना भेटतील व या संकटातून बळीराजाला सावरण्याकरिता मदत मिळवण्याचा प्रयत्न करणार असल्याचे पवार यांनी सांगितले.

दरम्यान, आगामी स्वराज संस्थांच्या निवडणुका लक्षात घेता उपाध्यक्ष प्रमोद हिंदूराव यांनी दसऱ्याच्या मुहूर्तावर अजित पवार यांच्या हस्ते मुरबाडमध्ये जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन केले. त्यानंतर माउली गार्डन येथे कार्यकर्ता मेळावा आयोजित केला होता. प्रतीक हिंदूराव यांनी मुरबाडमधील बंद पडलेल्या कारखान्यामुळे सुशिक्षित तरुणांपुढे रोजगाराची समस्या निर्माण झाली आहे, तसेच मेडिकल कॉलेज किंवा इंजिनिअरिंग कॉलेज व नाट्यगृह उभारण्यात यावे, अशी मागणी केली.

> **स्वतःच्या फायद्यासाठी ठेकेदारी करू नका**
>
> कार्यकर्त्यांना ठेकेदारीतून कामे करा; परंतु त्याचा सर्वसामान्य जनतेला फायदा झाला पाहिजे. स्वतःच्या फायद्यासाठी ठेकेदारी करू नका, असा सल्ला अजित पवार यांनी दिला. प्रवक्ते आनंद परांजपे, आ. दौलत दरोडा, जगन्नाथ शिंदे, भरत गोंधळी, चंद्रकांत बोस्टे आदींची यावेळी उपस्थिती होती.

# बांधिलकी प्रतिष्ठान अमरावती द्वारा ह.भ. प. सौ . छायाताई पाथरे यांचे किर्तन संपन्न !




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती –** ऐलेव्हन स्टार नवदुर्गात्सव मंडळ दिपक नगर प्लॉट वस्ती हनुमान मंदिररहाटगांव येथे दिनांक -२४ सप्टेंबर २०२५ बुधवार रोजी रात्री ८-३० वाजता बांधिलकी प्रतिष्ठान अमरावती तर्फे ह.भ.प.सौ. छाया गजेंद्र पाथरे यांचे संगीतमय कीर्तन संपन्न झाले. श्री. माधव रेखे यांनी दिलेल्या तबल्याच्या साथीमुळे किर्तन आणखीच रंगतदार झाले. बांधिलकी प्रतिष्ठानअमरावती असे समाजप्रबोधपर कार्यक्रम सातत्याने घेत असते.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून बांधिलकी प्रतिष्ठानच्या अध्यक्षा . डॉ.नीता प्रफुल्ल कचवे उपस्थित होत्या.एलेवेस्टा नवदुर्गा उत्सव मंडळ दीपक नगर रहाटगाव या समितीत असलेले कार्यकारणी सदस्यअध्यक्ष -रीना कुरुमबंशी, उपाध्यक्ष -कल्पना करुमबंशी, सदस्य-गीता कुरूमबंशी, पुजा करुमबंशी, निशा, भावना, पुनम, नीता, पिंकी, मीना,पुजा, प्रियंका, मनीषा , कूसुम, सुमन, सरोज, सिंधु, अनिता पटेल,कांचन डीहिए, यांनी आयोजक म्हणून संपूर्ण कुरुमबंशी परिवाराने या किर्तन सोहळ्याची विशेष तयारी करून पाहुण्यांचा तसेच किर्तनकार छायाताई पाथरे यांचा यशोचित सत्कार केला.श्री. गजेद्र पाथरे यांनी या किर्तनाच्या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विशेष मेहनत घेतली. किर्तनाला उपस्थितांनी भरभरून प्रतिसाद दिला.एलवेनस्टार नवदुर्गा मंडळाच्या अध्यक्षा रीना कुरुमबंशी तसेच बांधिलकी प्रतिष्ठानच्या अध्यक्षा ड.डॉ. नीता प्रफुल्ल कचवे यांनी उपस्थितांचे मनपूर्वक आभार मानले.

# जे.डी.पाटील सांगळूदकर महाविद्यालयात सोने समर्पण सोहळा संपन्न

## शिवदर्पण भित्तिपत्रकाचे विमोचन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४ दर्यापूर,**

कार्यक्रमाची सुरुवात सिमी (सोने) झाडाची पूजा करून झाली श्री.शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित, जे.डी.पाटील सांगळूदकर महाविद्यालय,दर्यापूर परिसरातील स्व.बाबासाहेब सांगळूदकर यांच्या पावन पूतळ्याजवळ शिव परिवार, दर्यापूर द्वारे आयोजित सोने समर्पण सोहळा विजयादशमीच्या पावन पर्वावर स्व.बाबासाहेब सांगळूदकर यांच्या पावन पूतळ्याला सोने अर्पण करून संपन्न झाला. उपस्थित सर्व मान्यवरांचे प्राध्यापक विनोद वानखडे जुनिअर कॉलेज आदित्य चिंचोलकर वर्ग बारावा व त्यांचा संच यांनी सर्वांचे स्वागत गीताने स्वागत केले या सोहळ्याचे अध्यक्ष मा.केशवराव गावंडे सदस्य कार्यकारी परिषद, श्री.शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती. होते. प्रमुख उपस्थितीत मा. कांचनमालाताई गावंडे, अध्यक्ष जिजामाता महिला मंडळ, दर्यापूर श्री.कुलभूषण गावंडे,अध्यक्ष स्व. बाबासाहेब सांगळूदकर अध्यसन मंडळ,दर्यापूर. तसेच महाविद्यालय विकास समिती तसेच कनिष्ठ महाविद्यालय व शाळा समितीचे सदस्य .मा.ब. उपाख्य अण्णासाहेब रेचे,महाविद्यालय विकास समितीचे सदस्य मा. प्रा.प्रभाकरराव कोलखेडे मा.डॉ. वसंतराव टाले,शाळा समितीचे मा.श्री.शिवाजीराव देशमुख , मा.श्री नरेंद्रजी लढ्ढा, मा.डॉ. दिनकरराव गायगोले, माजी कार्यकारिणी सदस्य श्री.शिवाजी शिक्षण संस्था, आजीवन सदस्य मा श्रीरंग पाटील अरबट, तसेच श्री.शिवाजी शिक्षण संस्थेचे दर्यापूर परिसरातीलआजीवन सदस्य, डॉ. पंजाबराव देशमुख जेष्ठ नागरिक संघ दर्यापूरचे सदस्य प्राचार्य डॉ.अतुल बोडखे उपस्थित होते.

याप्रसंगी अध्यक्ष म्हणून बोलतांना मा.प्राचार्य केशवराव गावंडे, महाविद्यालयाच्या भौतिक आणि सर्वांगीण विकासासाठी संस्था सदैव पाठिशी असल्याचे सांगितले, तसेच त्यांनी महाविद्यालयाच्या होणाऱ्या प्रगती बद्दल समाधान व्यक्त केले. यावेळी मा.कांचनमालाताई गावंडे यांनी स्व.बाबासाहेब सांगळूदकर यांच्या जीवन कार्याचा गौरव केला. तसेच स्व.बाबासाहेब सांगळूदकर यांचे विचार व कार्य सर्वांपर्यंत पोहोचले पाहिजे अशी अपेक्षा याप्रसंगी त्यांनी व्यक्त केली. आपल्या प्रस्ताविक व स्वागतपर भाषणातून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल बोडखे यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. महाविद्यालय क्रीडा,संशोधन, पर्यावरण पुरस्कार, पेटंट, नवीन अभ्यासक्रम सुरू करणे करणे सर्व आघाड्यांवर सदैव प्रगतिशील आहे. तसेच महाविद्यालयाच्या महाविद्यालयाच्या विकासासाठी दर्यापूर येथील शिव परिवाराचे वेळोवेळी सहकार्य लाभते असे त्यांनी या प्रसंगी सांगितले. यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत सौ. कल्पनाताई राजेंद्र धोटे, आदर्श हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथून उपमुख्याध्यापिका म्हणून सेवानिवृत्त झाल्याबद्दल तसेच सौ.प्रतिभा शरदराव पांडव मुख्याध्यापिका म्हणून आदर्श प्राथमिक शाळा येथे पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य केशवरावजी गावंडे यांच्या हस्ते करण्यात आला, तसेच याप्रसंगी 'शिवदर्पण' किशोर गोसावी व विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या हस्तलिखित भित्तिपत्रकाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले, या प्रसंगी स्वागतगीत प्रा.विनोद वानखडे, आदित्य निबोंळकर तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सादर केले. ,सूत्रसंचालन डॉ. संजय आगलावे, तर आभार डॉ. मिलिंद भिलपवार यांनी मानले, याप्रसंगी गावातील प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार बंधू शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते

# शिक्षकांच्या प्रशासनिक हक्कांसाठी ठाम पाऊल

## भाजपा शिक्षक आघाडीचे चंद्रशेखर भोयर यांचे अमरावती उपसंचालकांना ठोस निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

छझड अंतर्गत कार्यरत शिक्षकांच्या प्रशासनिक अडचणी व सेवासंबंधी हक्कांसाठी भाजप शिक्षक आघाडीचे प्रदेश सह संयोजक व शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष श्री. चंद्रशेखर भोयर यांनी अमरावती विभागीय शिक्षण उपसंचालकांना ठोस मागण्या घेऊन निवेदन सादर केले.



त्यांच्या निवेदनात दोन महत्त्वाच्या मुद्द्यांवर तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली आहे:

१. PRAN कार्डवरील नावाची अचूकता – त्वरित आदेश देण्याची मागणीसध्या हजारो छझड शिक्षकांच्या झठ–छ कार्ड किटवर नाव अपूर्ण, चुकीचे अथवा आधारकार्डाशी विसंगत आहे. यामुळे पेन्शन व्यवहार, शासकीय दस्तऐवजांची पडताळणी अशा अनेक प्रक्रियांमध्ये गंभीर अडचणी निर्माण होत आहेत.भोयर यांनी सर्व जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांना तातडीने आदेश देण्याची आणि नाव अचूक करण्यासाठी उपाययोजना राबवण्याची मागणी केली.

२. सेवाकाळातील शैक्षणिक अर्हतेची अधिकृत नोंद – कालमर्यादेत प्रक्रिया पूर्ण कराराज्यातील अनेक शिक्षकांनी सेवेत असताना इ.एव, च.–., च.झहळश्र, झह.ऊ सारख्या पदव्या मिळवल्या आहेत, मात्र त्या सेवा पुस्तिकेत नोंदवलेल्या नाहीत.या त्रुटींमुळे पदोन्नती, वेतनश्रेणी, वरिष्ठता अशा मूलभूत हक्कांवर परिणाम होत असून, संबंधित अधिकाऱ्यांना लेखी निर्देश देऊन प्रक्रिया निश्चित वेळेत पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली.

ठोस इशारा व लढाऊ भूमिकाया मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास शिक्षकवर्गाचे प्रश्न अधिक गंभीर होतील, असा कडक इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.शिक्षकांच्या हक्कांवर अन्याय सहन केला जाणार नाही, अशा स्पष्ट शब्दांत भोयर यांनी प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न केला.

# चांदूर रेल्वेत गांधी जयंतीला निराधारांचा 'अहिंसक शस्त्र'

## आंदोलन सुरू होताच प्रशासन हादरले, रखडलेले मानधन तातडीने देण्याचे आश्वासन

## आप, शिवसेना, भाकप, जनता दल, माकप व स्वा.शे. संघटनेचा पुढाकार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३चांदूर रेल्वे**

गांधी जयंतीचा दिवस... अहिंसेचा मार्ग... पण न्यायासाठी झगडणाऱ्या वृद्धांच्या डोळ्यांत अश्रू आणि उद्रेक दोन्ही होते. महिनोन्महिने थांबलेले मानधन मिळावे म्हणून श्रावणबाळ, निराधार व अपंग लाभार्थ्यांनी चांदूर रेल्वेत माजी न.प. उपाध्यक्ष तथा आम आदमी पार्टीचे नेते नितीन गवळी यांच्या नेतृत्वात 'जेल भरो' आंदोलनाला सुरुवात केली होती आणि सुरूवातीलाच प्रशासन हादरले. लेखी आश्वासन देत तातडीने मानधन खात्यात जमा करण्याची ग्वाही प्रशासनाला द्यावी लागली.

पोटभर जेवण मिळेल की नाही? हा प्रश्न शेकडो वृद्ध, अपंग व निराधारांच्या आयुष्यात दररोज उभा राहत होता. शासनाच्या दुर्लक्षामुळे ७–८ महिन्यांपासून मानधन रखडले होते. त्यामुळे हतबल झालेल्या लाभार्थ्यांनी गांधी जयंतीच्या दिवशी अहिंसक लढा उभारला होता. आम आदमी पार्टी, शिवसेना (ठाकरे गट), भारतीय कम्युनिष्ट पक्ष, जनता दल (से.), मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्ष व स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पुढाकाराने 'जेल भरो' आंदोलनाचा बिगुल वाजला. आंदोलनकर्त्यांच्या घोषणा आणि लाभार्थ्यांच्या अश्रूंनी वातावरण भारावून गेले.




२ ऑक्टोंबरला सकाळी ११ वाजतापासून सिनेमा चौकात आंदोलनाकरिता लाभार्थी एकत्र येणे सुरू झाले होते. दुपारी १२ वाजता मोर्चा तेथून निघणार असतांनाच स्थानिक तहसिल कार्यालयाचे नायब तहसिलदार सुधाकर अनासुने, मंडळ अधिकारी निलेश स्थूल, तलाठी दीपक चव्हाण, कर्मचारी राहूल कुकडी, रणजित चौधरी यांचे शिष्टमंडळ आंदोलनकर्त्यांजवळ पोहचले होते. त्यांनी लेखी पत्र देत मानधन तातडीने जमा करण्याचे आश्वासन आंदोलनकर्त्यांना दिले. यासोबतच जिल्हाधिकारी व संबंधित मंत्र्यांच्या पत्रांच्या प्रतही देण्यात आल्या व आंदोलन येथेच स्थगित करण्याची विनंती करण्यात आली. यानंतर उपस्थित सर्वांनी जवळपास १ तास चर्चा केल्यानंतर आंदोलनाला तात्पुरती स्थगिती दिली. मात्र आताही मानधन तत्काळ अदा न केल्यास तिव्र आंदोलन करण्याचाही इशारा महसुल शिष्टमंडळाला दिला. सदर आंदोलनाची दखल जिल्हा तसेच राज्यस्तरावर घेतल्याचे दिसून आले आहे. दसर्याच्या सणालाही हक्कासाठी लढणारे वृद्ध, अपंग आणि निराधारांचा जमाव चांदूर रेल्वेत उतरला, हेच या लढ्याचे मोठे यश ठरले. यावेळी आम आदमी पक्षाचे महाराष्ट्र उपाध्यक्ष प्रा. वसंतराव ढोके, आप नेते तथा माजी न.प. उपाध्यक्ष नितीन गवळी, मेहमूद हुसेन, भाकपचे विनोद जोशी, जनता दल (से.) चे प्रभाकर भगत, संजय डगवार, माकपचे रामदास कारमोरे, शिवसेना (ठाकरे गट)चे बंडूभाऊ यादव, गजानन यादव, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रशांत शिरभाते, दिनेश आमले, प्रा. प्रसेन्नजित तेलंग, भुषण नाचवणकर, सागर दुर्योधन, राजाभाऊ भैसे, महादेव शेंद्रे, विनोद लहाणे, मंगेश डाफ, भीमराव खलाटे, साहेबराव शेळके, प्रदीप मेश्राम, सागर पटले, लवकुश खुणे, रोशन हटवार, अवधुतवाडी भस्मे, प्रतिक भेंडे, सुनिल मेश्राम, सुधाकर यादव, प्रमोद हेरोडे, बादरभाई, विजय कळसकर, प्रभाकर यावले, गुलाबसिंग बघेल, मंगेश विरुळकर, देविदास कांबळे, नलिनी कळमकर, किसनराव भोगे, मधुकर हेरोडे, विठोबाजी विरुळकर, चंद्रकला वानखडे, कालावती नागोसे, शोभा नागोसे, रामराव कळमकर, ललिता खेरडे, इंदू क्षीरसागर, प्रभाबाई कैकाडी, भगवान वाघ यांसह अनेक कार्यकर्ते, लाभार्थी उपस्थित होते. आंदोलनस्थळी पीएसआय नंदलाल लिंगोट यांच्या नेतृत्वात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

**सरकारने आमचं ऐकावं – लाभार्थी**

आंदोलनस्थळी आलेल्या एका वृद्ध लाभार्थ्याने अश्रूंनी सांगितले की, बाळांनो, दहा–दहा दिवस भाकर दिसत नाही. सरकारने हे थोडके मानधन दिलं तरी आमचं पोट चालतं. पण महिनोन्महिने पैसे थांबवले... आम्ही काय खायचं? असे ते म्हणाले. याशिवाय त्याचवेळी एका अपंग व्यक्तीने वेदना मांडल्या की, औषधं घ्यायला पैसे नाहीत, हातपाय दुखून चालता येत नाही. तरी आज आम्ही हक्कासाठी रस्त्यावर आलो आहोत. सरकारने आमचं ऐकावं. असे म्हणाले.

**मानधन न आल्यास थेट कार्यालयात घुसून तिव्र आंदोलन – नितीन गवळी**

आम्ही आंदोलनाला सुरूवात करताच महसुल विभागाचे शिष्टमंडळ आमच्याकडे आले व लेखी पत्र देऊन आंदोलन मागे घेण्याची विनंती केली. त्यांच्यासोबत सविस्तर चर्चा करून त्यांच्या तांत्रिक अडचणी समजून घेऊन आम्ही तात्पुरते आंदोलन मागे घेतले. त्यांनी तातडीने मानधन देण्याचे लेखी आश्वासन दिले असुन येत्या काही दिवसात लाभार्थ्यांच्या खात्यात मानधन न आल्यास प्रशासनाला कुठलिही पुर्वसुचना न देता थेट तहसिल कार्यालयात घुसून तिव्र आंदोलन करू व त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहिल.

# अमरावती जिल्हा अतिवृष्टी जाहीर करुन शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजारांची मदत व सरसकट कर्जमाफी द्या

## युवा लॉयन्सची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

सतत होणाऱ्या पावसामुळे जिल्ह्यातील शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. क्षमतेपेक्षा अधिक पाऊस पडल्यामुळे जणावरे देखील दगावली आहे. बांधावर पिकच नाहीतर शेतकऱ्यांचे स्वन्पं, दिवाळीत घरात येणारे पिक सुध्दा वाहुन गेले. याचा फटका फक्त शेतकऱ्यांनाच बसला नसुन गावातील लहान मोठे व्यवसायिक व शेत मजुरांनाही बसला आहे. अतिवृष्टी होवुन सुध्दा शासनाने अमरावती जिल्हा अतिवृष्टी जाहीर केला नाही.त्यामुळे शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजाराची मदत करावी अशी मागणी योगेश गुडधे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

राज्य सरकारने २,२०० कोटीची केलेली मदत ही अतिशय तुटपुंजी आहे. राज्य सरकार शेतकऱ्यांची थट्टा करत आहे. पंजाब राज्याप्रमाणेच महाराष्ट्रात देखील हेक्टरी ५० हजाराची मदत मिळाली पाहीजे. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातुन शेतकऱ्याकडून करोडो रुपयांचा वसुल केलेला सेस राज्याच्या सकल उत्पन्नात कृषीचे १२% पैसे केव्हा कामात येतील शासनाने दिलेली मदत कोणत्या दराने दिली हे देखील स्पष्ट झाले पाहीजे ?

सरकारने शेतकऱ्याचा अजुन अंत पाहु नये व तात्काळ अमरावती जिल्हा अतिवृष्टी जाहीर करुन सरसकट कर्ज माफी व शेतकऱ्यांना वाढीव भरीव मदत करण्यात यावी.असे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले. यावेळी नितेश गुडधे, अमित निलकाजे,हंसराज गजभिये,सतीश तायडे,सचिन शिरसाट,प्रतीक हिवराळे,धीरज ठाकूर सह अन्य मान्यवर उपस्थित होते.

# दर्यापूर तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करा भाजपची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३दर्यापूर**

दर्यापूर तालुका हा विदर्भातील शेतीप्रधान भाग. इथल्या शेतकऱ्यांचा प्राणवायू म्हणजे खरीप हंगाम. परंतु यंदा २०२५ मध्ये पेरणीनंतर सतत एकसारखा पाऊस, हवामानातील विस्कळीतता आणि रोगराईमुळे तालुक्यातील बहुतांश पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. कपाशीचे पाते गळून पडले, सोयाबीनच्या शेंगा सडून नष्ट झाल्या, तुरीवर मर रोगाचा प्रादुर्भाव झाला तर मूगाचे पीक तर संपूर्णपणे अपयशी ठरले आहे.या भीषण संकटाच्या पार्श्वभूमीवर दर्यापूर तालुका संपूर्णपणे दुष्काळग्रस्त घोषित करण्याची मागणी भारतीय जनता पार्टीने केली आहे. भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष मदनपाटील बायस्कर , जिल्हा सचिव रवींद्र ढोकणे , जिल्हापदाधिकारी विजयराव मेंढे, अनिलभाऊ कुंडलवार, ज्ञानेश्वरराव पाथरे गुरुजी, सलीमभाई घाणीवाले श्रीकृष्णअण्णा डोंगरे , श्रीकांत धुमाडे, रविंद्र राजपूत आदींनी तहसीलदारांना निवेदन सादर केले. हे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे पाठविण्यात आले आहे. या निवेदनात पिकांचे झालेल्या प्रचंड नुकसानीचे वर्णन करून तातडीने दर्यापूर तालुका दुष्काळग्रस्त घोषित करण्याची मागणी करण्यात आली आहे.या प्रसंगी भाजपाचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावून नेणारे हे संकट तातडीच्या मदतीची मागणी करीत आहे. पिकांचे पंचनामे त्वरीत करून शेतकऱ्यांना मदतीचे वाटप करणे, पीकविमा योजना प्रभावीपणे राबवणे आणि कर्जमाफीच्या स्वरूपात दिलासा देणे ही काळाची गरज आहे.

# तिवसा शहरात ६९ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा

## भीम–बुद्धांच्या गाण्यांची मेजवानी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

तिवसा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथे ६९ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन व विजयादशमीचा सोहळा मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. या प्रसंगी शहर व परिसरातील बौद्ध बांधव समाज मोठ्या संख्येने एकत्र आला होता.कार्यक्रमाची सुरुवात विदर्भातील सुप्रसिद्ध गायक राहुल तायडे (अमरावती) व प्रीती तायडे यांच्या सुरेल आवाजात 'भीम–बुद्ध आर्केस्ट्रा'ने झाली. प्रबोधनपर गीतांच्या माध्यमातून समाज बांधवांना जागरूक करणाऱ्या या भव्य गायन कार्यक्रमाने उपस्थितांना भावनिक व ऊर्जामय वातावरणात गुंतवून ठेवले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवरांनी विनम्र अभिवादन केले. त्यानंतर संगीत, गाण्यांचा आस्वाद घेत समाज बांधवांनी जय भीम घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला.कार्यक्रमास तिवसा नगरपंचायत विरोधी पक्षनेते नगरसेवक अनिल थूल, देविदासजी निकाळजे, संदीप चक्रनारायण, अनंत शापामोहन,भास्करराव काळे सर , संदीप दहाट आदींची प्रमुख उपस्थिती लाभली.धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त झालेल्या या भीम–बुद्धांच्या जंगी गायन मेजवानीत तिवसा शहर व परिसरातील जनतेने उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात प्रशिक शापामोहन, प्रशिक मक्केश्वर, पिंटू उर्फ बाबा बनसोड, अक्षय माहोरे, राहुल नागदेवते, प्रशिक खाकसे, लकी शापामोहन ,सुयोग माहोरे, कमलेश शापामोहन, त्रिशूल खडसे, विनीत खाकसे, अक्षय खाकसे, सुमित शेंद्रे, विशाल शापामोहन, धीरज कस्तुरे, अनिकेत खाकसे,मंगेश खाकसे, प्रभात शापामोहन आदी आंबेडकरी चळवळीतील अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# पुणे करार आरक्षणाचे फलित-डॉ. विकास जांभुळकर

## विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राची पुणे करार दिनानिमित्त व्याख्यानमाला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

राजकारणातून नैतिकता पाळली गेली असती, तर अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ मिळाले असते. मात्र तसे झाले नाही आणि त्याचेच फलित आरक्षणात झाले, असे मत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर येथील राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. विकास जांभुळकर यांनी मांडले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने पुणे करार दिनानिमित्त आयोजित व्याख्यानमाला प्रसंगी 'पुणे करार : नैतिकता व राजकीय प्रतिनिधित्व' या विषयावर व्याख्यान देतांना ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, प्रमुख अतिथी म्हणून परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड उपस्थित होते.



डॉ. जांभुळकर म्हणाले, भारतीय राजकारणाचं मूळ शोधण्याची आज गरज आहे. संख्याबळ अधिक असले, तर त्यांच्याकडून न्याय मिळेलच याची शाश्वती देता येत नाही. अस्पृश्यांचे प्रतिनिधित्व सुध्दा अस्पृश्यांनीच करावे अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ठाम भूमिका होती. जातीव्यवस्थेतून बाहेर पडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सतत लढा सुरू होता. १९३२ च्या करारातून अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची संकल्पना पुढे आली मात्र, त्याला महात्मा गांधींनी विरोध केला. महात्मा गांधी आणि मदनमोहन मालवीय यांच्या विरोधातून पुणे करार झाला व आरक्षण ही नवी संकल्पना पुढे आली, असेही ते म्हणाले.

प्रमुख अतिथी डॉ. नितीन कोळी म्हणाले, १९१९ च्या कायद्याचे दर दहा वर्षांनी पुनरावलोकन होणे गरजेचे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ब्रिटीश सरकारचे मन वळवले व आपली मागणी मान्य करून घेतली. आज जे संविधान आपल्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिले, त्यात डॉ. बाबासाहेबांचा कित्येक वर्षांपासूनचा संघर्ष आहे.

अध्यक्षीय भाषणातून प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, व्याख्यात्यांनी अतिशय उत्कृष्टरित्या विषयाची मांडणी केली आहे व यानिमित्ताने पुणे करारामागील परिस्थिती देखील व्याख्यानाच्या माध्यमातून कळली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वसमावेशक असे संविधान देशाला दिले आहे. संविधानामुळेच आज देश एकसंध असून डॉ. बाबासाहेबांना यासाठी किती संघर्ष करावा लागला असेल, याची कल्पना येते.

संत गाडगे बाबा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व मेणबत्ती प्रज्वलित करुन विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविकेतून डॉ. संतोष बनसोड यांनी आयोजनामागील भूमिका सांगितली. सूत्रसंचालन प्रा. जगदीश गोवर्धन यांनी, तर आभार डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाचे समन्वयक डॉ. रत्नशील खोब्रागडे यांनी मानले. व्याख्यान कार्यमाक्रमाला विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी, शहरातील गणमान्य नागरिक, विद्यार्थी, विद्यार्थींनी मोठए संख्येने उपस्थित होते.

# नवरात्र उत्सवात समाजजागृतीचा अनोखा संगम – व्यसनमुक्ती आणि स्त्रीभ्रूणहत्या निर्मूलनावर पथनाट्याचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

अमरावती शहरात सुरू असलेल्या नवरात्रोत्सवाला धार्मिक आणि सांस्कृतिक रंगत तर लाभलीच, पण यंदा सामाजिक भान जागविणाऱ्या एका उपक्रमाने संपूर्ण शहरवासीयांचे लक्ष वेधले. विदर्भाची महाराणी असा लौकिक असणाऱ्या अंबानगरी नवदुर्गोत्सव मंडळाच्या प्रांगणात ओबीजिवाय सोसायटीच्या वतीने व्यसनमुक्ती, स्त्रीभ्रूणहत्या व पर्यावरण संवर्धन या विषयांवर आधारित समाजप्रबोधनपर पथनाट्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ओबीजीवाय संघटनेचे अध्यक्ष डॉक्टर पूनम बेलोकार यांची मुख्य उपस्थिती होतीप्रसूती व स्त्रीरोग क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेल्या ओबीजिवाय सोसायटीला मंडळाच्या वतीने आरतीसाठी आमंत्रण मिळाले होते. मात्र केवळ आरती करून आपली जबाबदारी संपली असे न समजता सोसायटीच्या माजी अध्यक्षा व ढोले रुग्णालयाच्या संचालिका डॉ. मोनाली ढोले यांनी सामाजिक बांधिलकी जपली.



त्यांनी आपल्या रुणालयातील कर्मचाऱ्यांसह मिळून समाजहिताचा संदेश देणारे पथनाट्य तयार करून मंचावर सादर केले.या पथनाट्यातून नशा आणि व्यसनमुक्तीतून नवजीवन साकारूया, स्त्रीभ्रूणहत्या थांबवून सृष्टी वाचवूया असा प्रखर संदेश देण्यात आला. वाढत्या व्यसनाधीनतेमुळे उद्भवणाऱ्या समस्या, घरांचे होणारे विघटन आणि तरुण पिढीचा होणारा नाश यावर प्रभावी प्रकाश टाकण्यात आला. त्याचबरोबर अजूनही अनेक ठिकाणी सुरू असलेली स्त्रीभ्रूणहत्या ही मानवी समाजासाठी लाजिरवाणी बाब असल्याचे दाखवून मुलगी वाचवा हा जनजागृतीपर संदेश दिला.शाळा क्रमांक ६ च्या प्रांगणात सादर झालेल्या या प्रभावी नाट्यप्रयोगात दिव्या मेहरे, सलोनी दवंडे, सेजल देहनकर, शीतल वैष्णव, वैष्णवी चौधरी, पल्लवी, सेजल कांबळी, अरबाज शाह, प्रतीक मनोहर, नैना रामटेके, गौरी गिरणारे, राहुल सरदार, अनिल सिरसाट, शुभम टापरे, विलास खडसे, आदींनी सहभाग घेतला यावेळीसुनीता भेले, मुक्ता इंगोले, रोशनी धानोरकर, लीना महाजन, माया लकडे, क्षिप्रा मानकर, संगीता बुरंगे उपस्थित होते. या सर्वांनी आपल्या अभिनयातून नागरिकांच्या मनाला चटका लावणारा आणि विचार करायला लावणारा संदेश दिला. कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या नागरिकांनी या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. अनेकांनी धार्मिक उत्सवामध्ये फक्त आरती आणि पूजाअर्चा मर्यादित न ठेवता समाजाला दिशा देणारा संदेश देणे ही खरी देवसेवा आहे अशा प्रतिक्रिया दिल्या.नवरात्रोत्सवासारख्या भक्तिमय वातावरणात समाजजागृतीचा अनोखा संगम घडवून ओबीजिवाय सोसायटी व ढोले रुग्णालयाने एक आदर्श निर्माण केला आहे. व्यसनमुक्ती व स्त्रीभ्रूणहत्या निर्मूलनासारख्या ज्वलंत प्रश्नांवर केलेला हा प्रभावी नाट्यप्रयोग अमरावतीकरांसाठी केवळ प्रबोधन नव्हे, तर एक जीवनदायी प्रेरणा ठरला आहे.

# श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचा १०१ वा विजयादशमी महोत्सव

## ५ हजारावर विद्यार्थ्यांनी सादर केल्यात चित्तथरारक कवायती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

देशाला बलवान करायचे असेल तर समाजाला बलवान करावेच लागणार, याच राष्ट्रभक्तीच्या ध्येयांनी प्रेरित (कै.) अंबादासपंत व अनंत वैद्य बंधुंनी श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाची स्थापना १९१४ मध्ये केली. समाजाला युवापिढीला मैदानी खेळांतून सक्षम करण्यासाठी १९२५ पासून विजयादशमी महोत्सवाची मुहूर्तमेढ रोवली. १०९ वर्षांहून श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ विजयादशमी महोत्सवाचे आयोजन करीत असून, गुरूवारी २ ऑक्टोबरला दसरा मैदान येथे सायंकाळी ५ वा. १०५१ व्या विजयादशमी या राष्ट्रीय महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. देशातील ५ हजार विद्यार्थी पारंपारीक व आधुनिक खेळ, चित्तथराक कवायती व सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांचे लक्ष वेधले.विदर्भाचे कुलदैवत श्री



अंबादेवी श्री एकवीरा देवी शारदीय महोत्सवाचा समारोप दशमीला व अंबामातेच्या सिमोल्लंघन सोहळ्यातून होतो. या वेळी देवीच्या स्वागतासाठी दसरा मैदान येथे श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचा विजयादशमी सोहळा राष्ट्रभक्तीला ऊर्जा देणारा ठरतो. मंडळाचे प्रधान सचिव प्रभाकरराव वैद्य यांचे मार्गदर्शन व प्रमुख उपस्थितीमध्ये आयोजित या सोहळ्याला प्रमुखअतिथी म्हणून जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मनपा आयुक्त सौम्या शर्मा, डायरेक्टर जनरल व सीईओ बिहार राज्य खेळ प्राधिकरणाचे रवींद्रन शंकरन, क्रीडा भारतीचे राष्ट्रीय संघटन मंत्री प्रसाद महानकर, अपर आदिवासी आयुक्त जितेंद्र चौधरी, मंडळाचे कार्याध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, सचिव डॉ. माधुरी चेंडके, कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, सचिव डॉ. विकास कोळेश्वर, सचिव प्रा. रवींद्र खांडेकर, प्रा. प्रणव चेंडके, प्रा. दीपा कान्हेगावकर यांच्यासह मंडळाचे ज्येष्ठ पदाधिकारी व सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

गोला, भाला, दांडपट्टा ड्रिल, विटाफेक, सिंगल दांड पट्टा, डबल दांडपट्टा, लेझीम, सिंगल लाठी, दो हाती तलवार, ढाल तलवार, एरोबिक्स, योगा ड्रिल, बॉक्सींग तायक्वांडो, बॉडी बिल्डींग, टॉर्चेस मार्चिंग व समुहगान असे पारंपारीक व आधुनिक खेळांच्या कवायती व सादरीकरण सादर करण्यात आले दोन तास चाललेल्या या कार्यक्रमाला अमरावतीकर नागरिकांनी मात्र चांगलीच गर्दी केली होती.

# भक्तिरसात न्हालेली अंबादेवी-एकवीरा देवीची पालखी यात्रा - हजारो भक्त पालकी यात्रेत सहभागी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

प्रत्येक वर्षीप्रमाणे यंदाही विजयादशमी अर्थात दसऱ्यानिमित्त अमरावतीसह संपूर्ण विदर्भातील कुलस्वामिनी मानल्या जाणाऱ्या श्री अंबादेवी व श्री एकवीरादेवी यांची सीमोल्लंघन यात्रा मोठ्या उत्साहात पार पडली. या निमित्ताने श्री अंबादेवी मंदिर संस्थान व श्री एकवीरादेवी संस्थानतर्फे दोन्ही देवतांच्या उत्सव मूर्तींना सजविलेल्या पालख्यांमध्ये विराजमान करून नगरभ्रमण घडविण्यात आले.



ही भव्य शोभायात्रा मंदिर संस्थानातून प्रारंभ होऊन भुतेश्वर चौक, रविनगर मार्गे बियाणी महाविद्यालय परिसरात पोहोचली. तेथे पालखी पूजनानंतर यात्रेचा समारोप करण्यात आला. संपूर्ण मार्गावर ठिकठिकाणी भाविक भक्तांनी अंबादेवी व एकवीरादेवीच्या उत्सव मूर्तींचे दर्शन व पूजन केले. शोभायात्रेचे विविध ठिकाणी मोठ्या भक्तिभावाने स्वागत करण्यात आले.

यात्रा मार्ग रंगीबेरंगी रांगोळ्यांनी सजविण्यात आला होता तसेच फुलांच्या माळांनी मार्ग खुलविण्यात आला होता. यावेळी सम्पूर्ण वातावरणात भक्तीमय उर्जा दरवळत होती. ढोल-ताशा, हलगी, लेझीम पथक व भजन मंडळांनी वातावरण अधिकच उत्साहवर्धक बनवले होते.या पालखी शोभायात्रेमध्ये अंबादेवी व एकवीरादेवी मंदिराचे सर्व विश्वस्त, भक्तगण व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यात्रा शांततेत व भक्तिभावात पार पडली.

# जागतिक कौशल्य स्पर्धेत सहभागासाठी मुदतवाढ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती**

शांघाई येथे होणाऱ्या जागतिक कौशल्य स्पर्धेत सहभागी होण्याची संधी जिल्ह्यातील युवकांना मिळणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आता १५ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. दर दोन वर्षांनी होणाऱ्या या स्पर्धेत युवकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुकत प्रांजली बारस्कर यांनी केले आहे.जगातील सर्वात मोठी व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य उत्कृष्टता स्पर्धा होणार आहे. यात जगभरातील २३ वर्षाखालील तरुणांना ऑलिम्पिकच्या धर्तीवर कौशल्य सादर करण्याची स्पर्धा होणार आहे.जागतिक स्तरावरील कौशल्य स्पर्धेच्या पूर्व तयारीच्या दृष्टीने ६३ क्षेत्राशी संबंधित जिल्हा व राज्यस्तरावर व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, सेक्टर स्किल कॉन्सील, विविध औद्यागिक आस्थापना यांच्या सहकार्याने स्किल कॉम्पीटीशन आयोजित करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हा, विभाग, राज्य आणि देश पातळीवर निवड केलेल्या उमेदवारांची नावे जागतिक नामांकनासाठी पाठविण्यात येणार आहे.जागतिक कौशल्य स्पर्धेच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय कौशल्य स्पर्धेकरीता जागतिक कौशल्य स्पर्धेसाठी वयोमर्यादा हा एकमेव निकष ठरविण्यात आला आहे.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा महत्त्वाचा निर्णय; महाविद्यालयांचे नामफलक मराठीतच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अधिसभेच्या झालेल्या बैठकीत एक ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार अमरावती विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व संलग्न महाविद्यालयांना आपले नामफलक फक्त मराठी भाषेतच लावणे बंधनकारक केलं आहे. अमरावती, अकोला, बुलडाणा, वाशीम आणि यवतमाळ जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये हा नियम सक्तीने लागू होणार आहे.

**मराठी नामफलक अनिवार्य**

कुलगुरूंनी या संदर्भातील परिपत्रक जारी केलं असून, मराठी नामफलक अनिवार्य असल्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. यामुळं विद्यार्थ्यांपासून पालकांपर्यंत सर्व स्तरात मराठी भाषेबाबतचा आत्मसन्मान आणि अभिमान वृद्धिंगत होणार आहे. केंद्र सरकारने ३ ऑक्टोबर २०१४ रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला होता. त्यानंतर ३ ऑक्टोबर २०२३ रोजी महाराष्ट्र शासनाने मराठी भाषा सप्ताह साजरा करण्याचे निर्देश दिले होते.




**सामाजिक क्षेत्रात मराठीचं अस्तित्व अधिक बळकट**

सिनेट सदस्य अमोल देशमुख यांनी सभेत हा ठराव मांडला होता. त्यांचा ठराव सर्वानुमते मंजूर झाला आहे. देशमुख यांनी सांगितलं की, मराठी ही केवळ भाषा नसून आपल्या संस्कृतीची आणि परंपरेची ओळख आहे. महाविद्यालयीन शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात मराठीचं अस्तित्व अधिक बळकट करण्यासाठी हा निर्णय ऐतिहासिक ठरेल. महाविद्यालयांच्या परिसरात विद्यार्थ्यांना, पालकांना आणि स्थानिक जनतेला मातृभाषेच्या नामफलकामुळं अधिक जवळीक आणि आपलेपणाची जाणीव होईल. त्यामुळं शैक्षणिक क्षेत्रासोबतच समाजात मराठी भाषा आणि संस्कृतीचा गौरव अधिक दृढ होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

**मराठी भाषा संवर्धनाच्या दिशेने एक पाऊल**

या निर्णयामुळं विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व महाविद्यालयांच्या नामफलकांवरून इंग्रजी किंवा इतर भाषांचे वर्चस्व संपुष्टात येणार असून, मराठी भाषेचे स्थान अधिक दृढ होईल. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या या उपक्रमामुळं मराठी भाषा संवर्धनाच्या दिशेने एक भक्कम टप्पा गाठला गेला आहे.

# शिक्षक मतदारसंघासाठी मतदार नोंदणी, ३० डिसेम्बरला अंतिम यादी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३बुलढाणा**

भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनानुसार अमरावती विभागातील शिक्षक विधानपरिषद मतदारसंघाच्या मतदार यादीचे पुनरिक्षण करुन नव्याने मतदार याद्या तयार करण्यात येणार आहे. यासाठीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

या मतदार नोंदणीसाठी अमरावती आयुक्त हे मतदार नोंदणी अधिकारी असून, जिल्हाधिकारी हे सहायक मतदार नोंदणी अधिकारी म्हणून कार्य करतील. तसेच जिल्ह्यातील सहा उपविभागीय अधिकारी हे सहायक मतदार नोंदणी अधिकारी व तहसीलदार हे पदनिर्देशित अधिकारी असतील. घोषित कार्यक्रमानुसार १५ऑक्टोबर रोजी प्रथम पुनःप्रसिद्धी, २५ ऑक्टोबर रोजी द्वितीय पुनःप्रसिद्धी, दावे व हरकती सादर करण्याची अंतिम तारीख ६ नोव्हेंबर राहील. २५ नोव्हेंबर रोजी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध केली जाईल. त्यानंतर २५ नोव्हेंबर ते १० डिसेंबरपर्यंत दावे व हरकती स्वीकारण्यात येतील. २५ डिसेंबरपर्यंत दावे व हरकती निकाली काढून पुरवणी यादी तयार करण्यात येईल. ३०डिसेंबर रोजी मतदार यादी अंतिम होणार आहे.

**नोंदणीचे निकष**

राज्य शासनाने निवडणूक आयोगाच्या मान्यतेने निश्चित केलेल्या माध्यमिक शाळेपेक्षा कमी दर्जा नसलेल्या शैक्षणिक संस्थांमध्ये मागील ६ वर्षामध्ये किमान ३ वर्षे पूर्णवेळ शिक्षक म्हणून कार्यरत असलेले शिक्षक नोंदणीस पात्र आहे. त्यांना मतदार नोंदणीसाठी सुधारित नमूना क्रमांक १९ मध्ये आवश्यक कागदपत्रांसह व प्रमाणपत्रांसह अर्ज सादर करता येणार आहे. ज्या शिक्षकांची नावे अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या विद्यमान मतदार यादीमध्ये समाविष्ट आहेत, त्यांनीही नव्याने



नमूना १९ अर्ज आवश्यक कागदपत्रांसह व प्रमाणपत्रासह सादर करणे आवश्यक राहणार आहे.बुलढाणा जिल्ह्यातील पात्र शिक्षकांना शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाने दिलेले प्रमाणपत्रासह अर्ज सादर करणे आवश्यक आहे. हा नमुना १९ व विहित प्रमाणपत्राचा नमुना जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. अर्ज संबंधित तहसिल कार्यालयात भरुन देता येणार आहे.

**एकगठ्ठा पद्धतीला चाप**

यापूर्वी राजकीय पक्ष पात्र मतदारांच्या अर्जाचे गठठे नोंदणी साठी सादर करत होते. मात्र यंदा राजकीय पक्षांना एकगठ्ठा अर्ज करता येणार नाही.नमूना क्रमांक-१९ मधील एकगठ्ठा अर्ज, मग ते व्यक्तिशः दाखल केलेले असोत अथवा पोस्टाने पाठविलेले असोत, मतदार नोंदणीसाठी विचारात घेतले जाणार नाहीत. मात्र पात्र शैक्षणिक संस्थेचे प्रमुख हे त्यांच्या संस्थेतील पात्र कर्मचाऱ्यांचे अर्ज एकत्रित पाठवू शकतील. राजकीय पक्ष, मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी, रेसीडेन्ट वेलफेअर असोसिएशन यांनाही एकगठ्ठा अर्ज करता येणार नाहीत, असे आयोगाने स्पष्ट केले आहे. पात्र शिक्षकांनी ६ नोव्हेंबर,पर्यंत विहित नमूना-१९ मधील अर्ज आवश्यक प्रमाणपत्रांसह दाखल करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# नोकरी मिळाली, कुटुंबाची चिंता मिटली : अनुकंपाधारकांनी व्यक्त केल्या भावना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

शासकीय नोकरीत असलेल्या घरातील कर्त्याचा अचानक मृत्यू झाला. अचानक झालेल्या या आघाताने पूर्ण कुटुंबाला आर्थिक विवंचनेत टाकले. मात्र अनुकंपाधारकांसाठी असलेल्या सोयीमुळे घरातील एकाला नोकरी मिळाली. त्यामुळे आता कुटुंबाची चिंता मिटली आहे, अशा भावना अनुकंपा तत्वावरील नियुक्ती मिळालेल्यांनी व्यक्त केल्या आहे. अमरावतीतील जनैद खानला आईच्या निधनामुळे अनुकंपा तत्वावर नोकरी मिळाली आहे. शासनाने अनुकंपा तत्वावरील नोकरीचे धोरण राबविण्यास सुरवात केली असल्यामुळे त्याला जिल्हाधिकारी कार्यालयातून बोलावणे आहे. त्याला अनुकंपाधारकांनी दाखल करावयाचे कागदपत्रे यांची माहिती देण्यात आली. त्यानंतर दि. १ ऑक्टोबर रोजी त्याची कागदपत्रे पडताळणी झाली. अवघ्या काही दिवसांत म्हणजेच दि. ४ ऑक्टोबर रोजी त्याला नियुक्तीपत्र देण्यात येणार आहे. आईच्या निधनामुळे कुटुंबियांची जबाबदारी आपल्यावर आली होती. आता नोकरीमुळे भविष्य सुरक्षित झाले असल्याची भावना त्याने व्यक्त केली.प्रणाली दहातोंडे यांचे वडील सामान्य रूग्णालयात कार्यरत होते. त्यांचा २०१५ मध्ये मृत्यू झाला होता. त्यामुळे कुटुंबाची परिस्थिती हालावली. त्यानंतर ४ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात अनुकंपाधारकांकडून पसंतीक्रम घेण्यात आला. त्यानुसार प्रणाली दहातोंडेची नियुक्ती बांधकाम कामगार मंडळात नियुक्ती देण्यात आली आहे. त्यामुळे कुटुंबाच्या पालनपोषणाचा प्रश्न मिटला असल्याने प्रणाली दहातोंडे यांनी सांगितले.अमरावतीतील फॉरेस्ट कॉलनी येथील रहिवासी सुमित वाघाळे यांनी शासनाने तातडीचा उपक्रम म्हणून अनुकंपाधारकांची नियुक्ती करण्याचे स्वागत केले. सुमितचे वडील वन विभागात वनपाल म्हणून कार्यरत होते. कर्तव्यावर असताना त्यांचा मृत्यू झाला होता. घरातील कर्त्या पुरूषाचा मृत्यू झाल्याने आर्थिक संतुलन बिघडले होते. शासनाने प्रदिर्घ कालावधीनंतर अनुकंपातत्वावरील नियुक्तीला गती दिली आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पुरवठा निरीक्षक म्हणून नियुक्ती मिळाली आहे. त्यामुळे कुटुंब आणि लहान भावाचा सांभाळ करणे शक्य होणार आहे. राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयामुळे नियुक्ती मिळणे शक्य झाले असल्याने सुमित वाघाळे यांनी आभार व्यक्त केले. मोर्शी येथील वैष्णवी दाभाडे हिचे वडील पोलिस दलात कार्यरत होते. त्यांचा ५ फेब्रुवारी २०१७ रोजी मृत्यू झाला. कुटुंबात आई आणि बहिण होती. त्यांचा सांभाळ करणे कठिण काम होते. नोकरीची आवश्यकता असल्याने ४ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाने पसंतीक्रम देण्यासाठी बोलाविले. अनुकंपाधारकांना तातडीने नियुक्ती मिळावी, यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रयत्न केले. त्यामुळे आरोग्य विभागात कनिष्ठ लिपिक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यासाठी वैष्णवी दाभाडे हिने शासनाचे आभार मानले.

# भाषेला विशेष महत्व आहे, संरक्षण द्या - डॉ. मनिषा जाधव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती,**

मातृभाषा ही संवादाचे सर्वात श्रेष्ठ साधन आहे. सोबतच जगामध्ये असलेले ज्ञान प्राप्त करण्यासाठी मातृभाषेचा पाया पक्का असावा लागतो, त्यामुळे भाषेला विशेष महत्व आहे, हजारो वर्षांची परंपरा असलेल्या या भाषांना प्रत्येक नागरिकांने संरक्षण द्यावे, असे आवाहन मराठीच्या अभ्यासक डॉ. मनिषा जाधव यांनी केले. जिल्हा नियोजन सभागृहात अभिजात मराठी भाषा दिवसानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी आशिष येरेकर, अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंदा दाणेज, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपजिल्हाधिकारी विवेक जाधव, प्रसेनजित चव्हाण, ज्ञानेश्वर घ्यार, जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी डॉ. सुरज मडावी आदी उपस्थित होते.डॉ. जाधव म्हणाल्या, मराठी भाषेचा उगम प्राकृत भाषेतून झाला असून संस्कृतचा ओलावा लाभला आहे. त्यामुळे ती एक सुसंस्कृत भाषा ठरली आहे. दोन हजार वर्षांचा गौरवशाली इतिहास या भाषेला लाभला आहे. प्रत्येक कालखंडात उत्तम दर्जाचे मूळ साहित्य निर्माण झाले आहे. भविष्यात भाषेला



टिकून राहावयाचे झाल्यास भाषेप्रती आत्मचेतना जागरूक ठेवणे गरजेचे आहे. राज्य कारभारात मराठीला राजभाषेचा दर्जा दिला आहे. यातून कार्यव्यवस्था उभी राहिली आहे.

भाषा तयार होण्यासाठी बोली भाषा महत्वाची आहे. अपभ्रंषामधून मैलागणीक विविध शब्द उगम पावले आहेत. ही शब्द दररोजच्या वापरात आल्याने रूळले आहेत. मराठीला दोन हजाराहून अधिक काळाचा इतिहास राहिला आहे. देवनागरी आणि मोडी भाषेतून असलेल्या या लिपीतून संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, बहिणाबाई यांनी उत्तम साहित्य निर्माण केले. तर छत्रपती शिवाजी महाराज यांनी राज्यकारभार मराठीतून चालविला. मातृभाषेतून संकल्पना स्पष्ट झाल्यास जगातील कोणत्याही भाषेतून ज्ञानार्जन करण्यास अडचण येत नसल्याचे सांगितले. जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी, मराठीला समृद्ध वारसा लाभलेला असल्यामुळे अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. मराठीत सातत्याने अत्युच्च दर्जाचे साहित्य निर्माण झाले आहे. त्यासोबतच मराठी भाषा ही कालानुरूप प्रवाहित झाली आहे. वाचनसंस्कृती टिकल्यास लेखकांना प्रेरणा मिळणार आहे. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे मराठी भाषेतील संशोधन कार्याला अनुदान मिळणार आहे. मराठीचा उगम झालेल्या रिद्धपूर येथे मराठी भाषा विद्यापीठ आहे. त्यामुळे मराठी भाषेतील सातत्य टिकवून ठेवण्यास प्रयत्न करावे, असे आवाहन केले. डॉ. मडावी यांनी प्रास्ताविक केले. निरीक्षक अधिकारी चैताली यादव यांनी सूत्रसंचालन केले. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सुरेंद्र रामेकर यांनी आभार मानले.

# ओला दुष्काळ की शेतकरी कर्जमाफी? मुख्यमंत्री दोन दिवसात मोठी घोषणा करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३मुंबई**

राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देणारी बातमी हाती आलीय. दोन दिवसात मुख्यमंत्री शेतकऱ्यांना मदतीची मोठी घोषणा करणार असल्याची माहिती मंत्री गिरीश महाजन यांनी दिलीय. सरकार शेतकरी कर्जमाफीची घोषणा करणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. अतिवृष्टी झाल्यामुळे पिकांचे नुकासान झाल्यानं राज्यात ओला दुष्काळ जाहीर करण्यात यावा अशी मागणी केली जातेय. त्यामुळे मुख्यमंत्री कदाचित दोन दिवसात ओला दुष्काळ जाहीर करतील अशी शक्यता वर्तवली जात आहे.राज्यात अतिवृष्टीनं शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. लाखो हेक्टर पीक अतिवृष्टीमुळे वाया झालंय. तर नद्यांना आलेल्या महापुरामुळे शेतजमीन वाहून गेल्या आहेत. त्यामुळे शेतात पुढील पीक कसं घ्यायचं असा प्रश्न बळीराजाला पडलाय. दरम्यान शेतकऱ्यांच्या मदतीसीठी सरकारनं ओला दुष्काळ जाहीर करावा. शेतकरी कर्जमाफीची घोषणा सरकारनं करावी, अशी मागणी विरोधक आणि शेतकऱ्यांकडून केली जात आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत